| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक २५ वा | शनिवार दिनांक २८ मार्च, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

ढोकी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दिपक वय ४० वर्षे, रा. वाखरवाडी ता. जि. धाराशिव यांनी दि २६.०३.२०२६ रोजी .वाखरवाडी येथील जिल्हा परिषद जवळ टपरीमध्ये महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ गुटखा, विमल पान मसाला, गुटखा, व्ही १ तंबाखु, डायरेक्टर पान मसाला, राजनिवास सुगंधी पान मसाला असा एकुण ४,०४४ किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला ढोकी पो ठाचे पथकास मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द भा.न्या.सं. कलम- २२३, २७५ सह ५९ अन्न सुरक्षा व मानके कायदा अन्वये ढोकी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### येडशी येथून मोटारसायकलची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी ओम शिवकुमार गुरव, वय १८ वर्षे, रा. जगताप नगर येडशी ता. जि. धाराशिव यांची अंदाजे ६०,००० किंमतीची मोटरसायकल ही दि. ०३.०३.२०२६ रोजी फिर्यादीचे राहते घरासमोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी ओम गुरव यांनी दि.२६.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### कंडक्टरची तारेची चोरी

भुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे : दि.२५.०३.२०२६ रोजी ते दि.१०.०३.२०२६ रोजी १२.३० वा. पुर्वी उमाचीवाडी व दुधोडी शिवारातील २९ स्पॅन मधील कंडक्टर(तारा), दुधोडी शिवारातील १८ स्पॅन मधील कंडक्टर(तारा) असा एकुण १,५०,०००किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अमोल मोटे यांनी दि.२६.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भुम पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### इंदुबाई शेटे यांचे निधन



धाराशिव (प्रतिनिधी)- तालुक्यातील उपळा ( मा.) येथील इंदुबाई हणमंत शेटे ( वय - ७५ ) यांचे गुरुवार दि. २६ मार्च रोजी सायंकाळी निधन झाले. त्यांचे उपळा (मा.) येथे दि. २६ मार्च रोजी रात्री उशीरा अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, चार मुली , सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# जनगणना २०२७ ची तयारी: ३७३१ कर्मचारी सज्ज

धाराशिव (जिमाका)आगामी जनगणना प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व तहसील कार्यालये तसेच नगरपरिषद व नगरपंचायतींच्या स्तरावर व्यापक मनुष्यबळाची नियुक्ती करण्यात आली असून संपूर्ण यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे.जिल्ह्यातील विविध प्रशासकीय घटकांमार्फत एकूण २८५० गणक (Enumerators) आणि ४७१ पर्यवेक्षक (Supervisors) यांची नियुक्ती करण्यात आली असून राखीव कर्मचारी धरून ही संख्या अनुक्रमे ३१९८ व ५२६ पर्यंत पोहोचली आहे.एकूण ३७३१ कर्मचाऱ्यांचा सहभाग या प्रक्रियेत राहणार आहे. तहसील कार्यालयांच्या पातळीवर धाराशिव,तुळजापूर,उमरगा,लोहारा,भूम ,परंडा, वाशी आणि कळंब या आठही तालुक्यांमध्ये गणक व पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. धाराशिव तहसील कार्यालयात सर्वाधिक ४५६ गणक व ७६ पर्यवेक्षक नियुक्त करण्यात आले असून,तुळजापूर,उमरगा आणि कळंब या तालुक्यांमध्येही मोठ्या प्रमाणात कर्मचारी नेमण्यात आले आहेत.प्रत्येक तहसीलस्तरावर आवश्यक तेवढे राखीव कर्मचारी देखील ठेवण्यात आले आहेत, जेणेकरून कोणत्याही अडचणीच्या प्रसंगी कार्यात खंड पडणार नाही.नगरपरिषद व नगरपंचायत स्तरावर देखील गणक व पर्यवेक्षकांची स्वतंत्र नियुक्ती करण्यात आली आहे.

धाराशिव,तुळजापूर,उमरगा,भूम, परंडा, कळंब,मुरूम,नळदुर्ग तसेच लोहारा व वाशी नगरपंचायतींमध्ये मिळून मोठ्या प्रमाणात कर्मचारी तैनात करण्यात येणार आहेत. नगरपरिषद धाराशिव येथे २०६ गणक व ४२ पर्यवेक्षक,तर तुळजापूर व उमरगा येथे अनुक्रमे ६४ व ७० गणकांची नियुक्ती करण्यात आली आहे.या संपूर्ण प्रक्रियेसाठी जिल्ह्यात एकूण १८ चार्ज कार्यालये कार्यरत असून,प्रशिक्षणासाठी ८० बॅचेस आणि १८ प्रशिक्षण केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे.मास्टर ट्रेनर्स,फील्ड ट्रेनर्स यांचीही नियुक्ती करण्यात आली असून,सर्व संबंधितांना आवश्यक ते प्रशिक्षण देऊन जनगणना प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यावर भर दिला जात आहे.प्रशासनाने यासाठी काटेकोर नियोजन केले असून जिल्ह्यातील जनगणना प्रक्रिया अचूक व पारदर्शकपणे पार पडणार आहे.

# धाराशिव नगरपरिषदेसाठी ५ मेगावॅट सोलार प्रकल्पाचा मार्ग मोकळा? वीज बिलावर नगर पालिकेस मोठा दिलासा!

**आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नगराध्यक्ष नेहा काकडे यांच्या नेतृत्वात बचतीकडे वाटचाल!**



धाराशिव (प्रतिनिधी):- धाराशिव नगरपरिषदेला पाणीपुरवठ्यासाठी दरमहा येणाऱ्या भरमसाठ वीज बिलाच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी आता ठोस पावले उचलण्यात येत आहेत. उजनी धरणातून शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वीज वापरावी लागत असल्याने नगरपरिषदेला लाखो रुपयांचा आर्थिक बोजा सहन करावा लागत आहे. अनेक वेळा वीज तोडणीमुळे शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत होण्याच्या घटना घडत असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता.

या पार्श्वभूमीवर आमदार राणा जगजितसिंह पाटील मल्हार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि नगराध्यक्ष नेहा राहुल काकडे यांच्या नेतृत्वात महत्त्वाकांक्षी सोलार प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. धाराशिव शहराजवळ असलेल्या वरवंटी शिवारात महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या सुमारे १५ एकर जमिनीवर ५ मेगावॅट क्षमतेचा सोलार प्रकल्प उभारण्याची तयारी सुरू आहे.

नगरपालिका प्रशासनाच्या वतीने ही जमीन नगरपरिषदेकडे हस्तांतरित करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. दरम्यान, या जागेची प्राथमिक पाहणी करण्यात आली असून सोलार प्रकल्प उभारणीसाठी ती उपयुक्त ठरण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

या प्रकल्पामुळे नगरपरिषदेला वीज बिलावर होणारा लाखो रुपयांचा खर्च मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. तसेच सोलार ऊर्जा निर्मिती करून ती महावितरणला देण्याची योजना असल्याने भविष्यात आर्थिक बचत आणि स्थिर वीजपुरवठा मिळण्यास मदत होणार आहे.

या पाहणी दौऱ्यात पाणीपुरवठा सभापती विलास लोंढे, बांधकाम सभापती अभिजीत काकडे, नगरसेवक पंकज भोसले, पाणीपुरवठा अभियंता संग्राम भापकर, वरवंटी गावचे तलाठी तसेच वारी सोलार प्रकल्प भगवान शेजुळ यांच्या सह इतर कंपनीचे प्रतिनिधी आणि अधिकारी उपस्थित होते.

हा सोलार प्रकल्प कार्यान्वित झाल्यास धाराशिव नगरपरिषद आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास मोठी मदत होणार आहे.

# कै. माधवराव पाटील यांची शताब्दी जयंती विविध ठिकाणी उत्साहात साजरी

मुरुम (प्रतिनिधी) कै. माधवराव पाटील यांनी शिक्षण, सामाजिक, राजकीय व सहकार क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले. त्यांनी ग्रामीण भागात शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवून समाजातील दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले. सहकार चळवळीला बळकटी देण्यासाठी त्यांनी विठ्ठल साई सहकारी साखर कारखान्याची उभारणी केली. समाजकारणाबरोबरच राजकीय क्षेत्रात त्यांनी पारदर्शक व लोकाभिमुख नेतृत्व केले. ग्रामीण भागातील गोरगरीब, होतकरु मुला-मुलींना शिक्षणाची सोय व्हावी या उद्येशाने शैक्षणिक संकुलन उभे करणारे, शेती उद्योगाला चालना देण्याकरिता विठ्ठलसाई साखर कारखान्याची उभारणी करणारे विठ्ठलसाई सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष तथा नगर शिक्षण विकास मंडळाचे अध्यक्ष कै. माधवराव (काका) पाटील यांची रामनवमी दिनी १०० वी जयंती मुरुम शहरात विविध ठिकाणी गुरुवारी (ता.२६) रोजी मोठया उत्साहाच्या वातावरणात साजरी करण्यात आली. प्रारंभी कै. माधवराव पाटील यांच्या समाधीस्थळी भाजपचे नेते बसवराज पाटील, जिल्हा बँकेचे अध्यक्ष तथा नगराध्यक्ष बापूराव पाटील, उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण पाटील यांच्या हस्ते पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष व्यंकटराव जाधव, बबनराव बनसोडे, रशिद शेख, मदन पाटील आदिंची प्रमुख उपस्थिती होती. श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या प्रांगणातील कै. माधवराव पाटील यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास भाजपचे नेते बसवराज पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील, उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण पाटील, विठ्ठलसाई सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष सादिकमिया काझी, नगर शिक्षण विकास मंडळाचे सचिव व्यंकटराव जाधव, उमरगा जनता बँकेचे व्हाईस चेअरमन अँड. व्ही. एस. आळंगे, कारखान्याचे संचालक दिलीप भालेराव, माणिक राठोड, श्रमजीवी संस्थेचे संचालक मल्लीनाथ दंडगे, माजी नगराध्यक्ष धनराज मंगरुळे, प्रदीप दिंडेगावे, माजी प्राचार्य डॉ. दिलीप गरुड, प्राचार्य डॉ. राम सोलंकर, प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार, प्राचार्य डॉ. श्रीराम पेठकर, प्राचार्य डॉ. सदक वली, मुख्याध्यापक उल्हास घुरेघुरे, राजशेखर कोरे, अनुराधा जोशी, व्यंकट घोडके, सैपन शेख, धनराज खोंडे, श्रीपाद कुलकर्णी, कमलाकर मोटे, सच्चिदानंद अंबर आदिंची प्रमुख उपस्थिती होती. शहरातील कै. माधवराव पाटील सार्वजनिक वाचनालय, प्रतिभा निकेतन विद्यालय, मुरुम, कोथळी, भुसणी, प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूल व नूतन विद्यालय, माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, विठ्ठल साई सहकारी साखर कारखाना आदि ठिकाणी जयंती साजरी करण्यात आली.

## घरकामासाठी घेवून जावून तिच्यावर लैंगीक अत्याचार

परंडा(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत १७ वर्षीय ८ महिने मुलगी मे २०२५ ते दि.२१.०६.२०२५ रोजी हिस एका गावातील एका तरुणाने माझी आई आजारी आहे असे सांगुन पिडीतेस घरकामासाठी घेवून जावून तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. अशा मजकुराच्या पिडीतेचे अजोबा यांनी दि.२६.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं.कलम-६४(२)(एफ)(एम) सह कलम ४,६,८,१२ पोक्सो अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.२६ मार्च रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २२६ कारवाया करुन १,८०,८५० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

# घरगुती गणनेपासून डिजिटल जनगणनेपर्यंत - धाराशिव सज्ज जनगणना-२०२७ साठी

धाराशिव दि.२६ मार्च (जिमाका) आगामी जनगणना-२०२७ संदर्भात राज्यातील सर्व शहरी व ग्रामीण भागात जनगणनेच्या पूर्वतयारीस सुरुवात झाली असून जनगणना कामकाजात संयुक्त सचिव तथा मुख्य प्रधान जनगणना अधिकारी, मुंबई यांनी जनगणना संदर्भात टप्प्याटप्प्याने कार्यवाही करण्याबाबत कार्यपद्धती निश्चित करून दिली आहे.

जनगणना-२०२७ चे संचालन शासन व जनगणना कार्य संचालनालय महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच्या स्तरावरून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी,धाराशिव व जिल्हा जनगणना अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,धाराशिव यांच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्ययंत्रणेच्या स्तरावर जनगणना संबंधी घर यादी व गृहगणना (जनगणना २०२७ चा पहिला टप्पा) ही संपूर्ण प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी चार्ज जनगणना अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली असून जिल्ह्यातील सर्व तहसीलदार हे चार्ज जनगणना अधिकारी म्हणून जनगणनेचे संपूर्ण कामकाज पार पाडणार आहेत.

जनगणना-२०२७ च्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात जनगणना पूर्वतयारीला गती देण्यात आली असून घर यादी व गृहगणना टप्प्यापासून डिजिटल जनगणनेपर्यंत सर्व प्रक्रिया टप्प्याटप्प्याने राबविण्यात येणार आहे.त्यासाठी चार्ज जनगणना अधिकारी (तहसीलदार व मुख्याधिकारी) यांच्या कार्यालयाच्या स्तरावर जनगणना कामकाजासाठी आवश्यक ते अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

जनगणना-२०२७ च्या पहिल्या टप्प्यात घर यादी व गृहगणना ही मोहीम जिल्हास्तरावर व क्षेत्रीय कार्ययंत्रणेच्या स्तरावर प्रभावीपणे राबविण्यात येणार असून त्यासाठी धाराशिव जिल्ह्यात जनगणना - २०२७ चे कार्य पार पाडण्यासाठी आवश्यक ते मनुष्यबळ व संरचना निर्माण करण्यात आली आहे.

जनगणना पहिल्या टप्प्यासाठी जिल्ह्यात एकूण २८५० इन्शी लिस्टिंग ब्लॉक्स (HLB) निश्चित करण्यात आले असून २ मास्टर ट्रेनर,५२ फील्ड ट्रेनर,२८५० गणनाकर्मी (Enumerators) आणि ६२ पर्यवेक्षक (Supervisors) यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.सर्व संबंधितांना जनगणना-२०२७ चे प्रशिक्षण देण्यासाठी जिल्ह्यात १८ प्रशिक्षण केंद्र निश्चित करण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी,धाराशिव व जिल्हा जनगणना अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,धाराशिव यांच्या अधिनस्त जिल्हास्तरावर जनगणना कक्ष स्थापन करण्यात आला असून त्यामध्ये तहसीलदार-महसूल व तहसीलदार-(निवासी) यांची समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच कक्षांतर्गत जनगणना कामकाजासाठी आवश्यक ते कर्मचारी उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

तसेच जनगणना-२०२७ च्या पहिल्या टप्प्यातील अंमलबजावणीसाठी जिल्ह्यातील सर्व चार्ज जनगणना अधिकारी (तहसीलदार व मुख्याधिकारी) यांच्या कार्यालयात जनगणना कक्ष स्थापन करण्यात आले असून त्यासाठी आवश्यक ते अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

जनगणना-२०२७ च्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी चेतन प्रकाश सहायक संचालक,जनगणना संचालनालय,मुंबई यांची धाराशिव जिल्हा समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.त्यांनी दि. २४ व २५ मार्च रोजी जिल्ह्यातील सर्व चार्ज जनगणना अधिकारी (तहसीलदार व मुख्याधिकारी) यांच्या कार्यालयास भेट देऊन जनगणना-२०२७ च्या पूर्वतयारीचा सखोल आढावा घेतला आहे.

भारत सरकारच्या सहसचिव तथा मुख्य प्रधान जनगणना अधिकारी, जनगणना संचालनालय,महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार जनगणना-२०२७ च्या अनुषंगाने उपक्रमांची आखणी करण्यात आली असून जिल्हास्तरावर विविध बैठका घेण्यात येत आहेत.चार्ज जनगणना अधिकारी,नियुक्त नोडल अधिकारी, तहसीलदार,तलाठी,ग्रामसेवक व संबंधित कर्मचारी यांच्या सहभागातून घर यादी व गृहगणना (जनगणना-२०२७ चा पहिला टप्पा) प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.

# गाळे वाटपावरून उठलेल्या वादाला उत्तर; बाजार समितीचे ४६ गाळे फक्त खुल्या लिलावातूनच - सभापती शिवाजी कापसे



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- कृषि उत्पन्न बाजार समिती कळंब येथील ४६ गाळ्यांचे परस्पर वाटप करण्यात आल्याच्या चर्चांना अखेर बाजार समिती प्रशासनाने अधिकृत उत्तर दिले असून, एकाही गाळ्याचे अद्याप वाटप झालेले नाही; सर्व गाळे नियमानुसार खुल्या लिलाव प्रक्रियेतूनच दिले जाणार आहेत, असे स्पष्ट विधान बाजार समितीचे सभापती शिवाजी कापसे यांनी पत्रकार परिषदेत केले.

काही दैनिकांत प्रसिद्ध झालेल्या बातम्यांमुळे बाजार समितीच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण होत असताना सभापती कापसे यांनी थेट भूमिका घेत अफवांना पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला. बाजार समितीचा कारभार पूर्णपणे पारदर्शक असून कोणत्याही प्रकारे परस्पर निर्णय घेतलेले नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

मुख्य बाजार आवारातील ४६ गाळ्यांच्या बांधकामासाठी स्वारस्य अभिव्यक्ती अंतर्गत प्रस्ताव पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे पाठविण्यात आला होता. या प्रस्तावास दि. २८ नोव्हेंबर २०२५ रोजी मान्यता मिळाल्यानंतर जाहिरात प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली; मात्र निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने लिलाव प्रक्रिया पुढे ढकलावी लागली.

आचारसंहिता समाप्त झाल्यानंतर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. दि. २८ फेब्रुवारी रोजी लिलाव निश्चित करण्यात आला होता; परंतु व्यापारी व इच्छुकांकडून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यामुळे प्रक्रिया स्थगित करण्यात आली.

आता फेरलिलावाचा विषय आगामी संचालक मंडळाच्या सभेत मांडण्यात येणार असून त्यासाठी दि. १८ मार्च रोजी सभा नोटीस काढण्यात आल्याचे कापसे यांनी सांगितले. त्यामुळे गाळे परस्पर वाटप झाल्याच्या बातम्या वस्तुस्थितीपासून दूर असल्याचा दावा त्यांनी केला.

**विकासकामांवर भर**

बाजार समिती परिसरात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजना अंतर्गत शेतकरी भवन व गाळे बांधकामाची मंजुरी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. तसेच सुमारे ३ कोटी ७२ लाख रुपयांच्या रस्ते विकास कामांना अंतिम स्वरूप दिले जात असून, विद्युत तारामुक्त परिसर, वृक्षलागवड व पाणीपुरवठा योजना यांचेदेखील नियोजन सुरू आहे.

**निष्क्रिय परवान्यांवर कारवाई**

परवाना घेऊनही व्यवसाय न करणारे किंवा गाळा-भूखंड नसलेले सुमारे ४०० परवाने रद्द करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. कोणतेही कर्ज न घेता बाजार समितीचा आर्थिक कारभार चालवण्यात येत असून, मागील तीन वर्षांत उत्पन्नात दरवर्षी सुमारे ८० लाख रुपयांची वाढ झाल्याचा दावा सभापतींनी केला. उपसभापती श्रीधर भवर व संचालक मंडळाच्या सहकार्यामुळे बाजार समिती विकासाच्या दिशेने वाटचाल करत असून, शेतकऱ्यांपर्यंत अधिक योजना पोहोचविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचेही सभापती शिवाजी कापसे यांनी स्पष्ट केले.

ओ३म् भूर्भुव: स्व: ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो न: प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## जनतेला त्रास न होवू देण्याचा शासनाचा प्रयत्न

अमेरिका-इस्रायलने इराणविरोधात सुरू केलेले युद्ध आणि इराणने जागतिक ऊर्जा पुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा सागरी मार्ग असलेली होर्मुझची सामुद्रधुनी बंद केल्याचा परिणाम जगभरात दिसून येत आहेत. या पार्श्वभूमीवर भारत सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला असून पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात प्रत्येकी १० रुपयांची कपात केली आहे. ज्यामुळे पेट्रोलवरील शुल्क ३ रुपये प्रति लिटर आणि डिझेलवरील शुल्क हे शून्य रूपये प्रति लिटर झाले आहे. दरम्यान ही कपात झाली असली तरी याचा थेट फायदा ग्राहकांच्या होण्याची शक्यता कमी आहे. यामुळे इंधनाच्या किंमती कमी होणार नाहीत, कारण ऑईल मार्केटिंग कंपन्या या पेट्रोल पंपावरील विक्रीमध्ये त्यांना प्रति लिटरमागे होत असलेले नुकसान भरून काढण्यासाठी या कपातीचा वापर करून घेतील. सध्या ब्रेंट क्रूडच्या वाढलेल्या किंमतींमुळे भारतात विकल्या जाणाऱ्या प्रत्येक एक लिटर पेट्रोल किंवा डिझेलमागे ऑईल मार्केटिंग कंपन्यांना ४८.८ रुपयांचे नुकसान सहन करावे लागत आहे. अमेरिका-इस्रायलचे इराणसोबतचे युद्ध आणि होर्मुझच्या सामुद्रधुनी बंद करण्यात आल्याने कच्च्या तेलाच्या जागतिक किमतीने प्रति बॅरल १०० अमेरिकन डॉलर्सचा टप्पा ओलांडला आहे. देशातील सर्वात मोठी खासगी किरकोळ इंधन विक्रेता कंपनी नायरा एनर्जीने पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीमध्ये वाढ केल्याच्या दुसऱ्याच दिवशी ही कपात करण्यात आली आहे. नायरा एनर्जीने पेट्रोलचे दर ५.३ रुपये प्रति लिटर आणि डिझेलचे दर ३ रुपये प्रति लिटरने वाढवले आहेत. अमेरिका-इस्रायल आणि इराण या देशांमध्ये सुरू असलेले युद्ध आणि त्यानंतर इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये केलेल्या नाकेबंदीमुळे पश्चिम आशिया मधून होणारी तेल आणि वायूच्या निर्यातीत मोठा अडथळा निर्माण झाला आहे. याचा परिणाम जगभरात पाहायला मिळत आहे. होर्मुझची सामुद्रधुनी ही जागतिक ऊर्जा पुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. युद्ध सुरू होण्याच्या आधी जगात सागरी मार्गाने होणाऱ्या एकूण कच्चे तेल आणि गॅस पुरवठ्याचा सुमारे पाचवा हिस्सा, म्हणजेच दररोज साधारण २० ते २५ दशलक्ष बॅरल कच्चे तेल आणि सुमारे १० अब्ज क्यूबीक फूट गॅसची या अरुंद सागरी मार्गातून वाहतूक होत होती. कोणत्याही परिस्थिती जनतेला इंधनाचा त्रास होवू नये यासाठी भारताने प्रयत्न केले जात आहेत. कोणत्याही परिस्थितीत इंधनाचा तुटवडा भासू नये म्हणून जिल्हा स्तरावर मोठे प्रयत्न प्रशासनाने सुरु केले आहेत. गॅसवितरणांच्या कार्यालयात व गोडावुनला किती स्टॉक आहे या बाबत चौकशी केली जात आहे. काही झाले तरी राज्यात आता रॉकेल वितरण होण्यास सुरवात झाली आहे. गोरगरीबांना रॉकेलचा मोठा आधार होता. तो कशामुळे बंद केला हे कळून आले नाही. असे जरी असले तरी प्रत्यक्षात आता रॉकेलच्या माध्यमातूनच संकटावर मात करण्यात येत आहे. जो पर्यंत युद्ध विराम होणार नाही तो पर्यंत गॅस-इंधन संकट असणार आहे. इराण हा जगाला तेल पुरविणारा देश आहे. अमेरिकेच्या माऱ्यामुळे जीवन विस्कळीत झाले आहे. काही झाले तरी इंधन आयात करण्यात मोठ-मोठी संकटे येत आहेत. अमेरिका-इस्त्राईल मिळून इराणावर हल्ला करीत आहेत. तेलाच्या ठिकाणी हल्ले करणे म्हणजे मोठे संकटे दिसून येत आहे. इराणीमंडळी घायाळ होत आहे. भारताने मेडिकलचे साहित्य विमानाने पाठविली आहेत. जगातील सर्वच देशाबरोबर भारताशी मैत्रीचे संबंध आहेत. रशिया मित्र आहे. ईस्त्राईला नरेंद्र मोदी यांनी भेट दिली आहे. इराण सोबतचे संबंध चांगले आहेत म्हणून इंधनाबाबतचे मोठे संकट निर्माण झाले नाही. जनतेनी संयम पाळला पाहिजे. विनाकारण साठेबाजी नको. जेवढे इंधन लागते तेवढेच गाड्यामध्ये भरावेत. त्याच प्रमाणे गॅसच्या टाकीची सुद्धा साठवणुक करू नये. आहे तेवढा स्वयंपाकाचा गॅसचा वापर करावा. काटकसरीने जर वापर केला तर कधीही भारताला इंधनाचा कमतरता भासणार नाही. सध्याला भिती निर्माण केली जात आहे. ठराविकाकडून अपप्रचार केला जात आहे. हे योग्य नाही. भारतात जेवढे नैसर्गिक गॅस उत्पादक ठिकाणे आहेत, जेवढे इंधन लागते तेवढेचा साठा भारतात केला जातो. पर्याप्त साठा करण्याची आज पर्यंत गरज भासली नाही. इंधन कधीही कमी पडले नाही. अमेरिकेच्या धोरणाचा परिणाम जाणवत आहे. इराणावर हल्ले करण्याची गरज नव्हती. तेही इस्त्राईलच्या खांद्यावर बंदुक ठेवली जात आहे. आज इराणावर हल्ले केले तरी इराण थांबायाला तयार नाही. तोडीस-तोड उत्तर देत आहे. उलट अमेरिकेसमोर त्याने शर्ती ठेवल्या आहेत. इराणच्या अमेरिकेसमोर मागण्या ठेवल्याने अमेरिकेला सुद्धा विचार करावा लागणार आहे. मुळात या युगात युद्ध हे परवडणारे नाही. मोठे आर्थिक नुकसान होत आहे. मिसाईल, हवाई हल्ले हे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाहीत. त्यामुळे इराणच्या मनावर आहे की, इंधन कोणाला द्यायचे! भारता सोबतचे संबंध चांगले असल्याने आज पर्यंत इंधनाबाबत शॉर्टज् झाले नाही. आता युद्धामुळे संकट आले आहे. यातून भारत मार्ग काढत आहे. याला जनतेनी साथ दिली पाहिजे. काही झाले तरी अचानक निर्माण झालेले संकट आहे. इंधन, स्वयंपाकाचा गॅस आवश्यक आहे. त्यामुळे जीवनाचे चक्र फिरू शकणार नाहीत. आज पर्यंत प्रत्यक्षात गॅस मिळाला नाही म्हणून कोणी उपाशी राहीले असे घडले नाही. इंधनामुळे वाहातुक ठप्प झाली असेही घडले नाही. त्यामुळे सध्याला भारतात स्थिती समाधानाची आहे. युद्ध दिर्घ काळ चालेले असे सध्याला दिसत आहे. अर्धा महिणा झाला तरी इराण हा धैर्याने लढा देत आहे. माघार घेण्याचा कोणताही विचार नसल्याने अमेरिकेला आता विचार करण्याची वेळ आली आहे. मध्यस्थाची आता गरज भासणार आहे असे चित्र दिसून येत आहे. राज्य व केंद्र शासन जनतेला कोणताही त्रास होवू न देण्याचा विचाराने सहकार्य करीत आहे. जनतेनी सुद्धा सकारात्मक विचार करून मर्यादित वापर केला पाहिजे. मर्यादित वापर केला तर संकट निर्माण होणार नाही. यापुढे आता पर्यायी बाबीचा विचार केला पाहिजे. सौरऊर्जाचा अधिकाधिक वापराची गरज आहे. विनाखर्चिक सौरऊर्जा मिळते. यावरच सरकारने भर दिला पाहिजे. जनतेनी सुद्धा सौरऊर्जावर चालणारी यंत्रणा वापरण्यावर भर दिला पाहिजे.

# व्हॉलीबॉल उपांत्य फेरीत श्री वेताळेश्वर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी व विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय विजयी

### विश्वमैदान २०२६ आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत अंतिम लढत रंगणार




**लातूर/प्रतिनिधी :** विश्वमैदान २०२६ व्हॉलीबॉल स्पर्धेतील उपांत्य फेरीत श्री वेताळेश्वर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी (एसव्हीएसएस), लातूर आणि विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (व्हीडीजीएमसी), लातूर या दोन्ही संघांनी दमदार विजय मिळवत अंतिम फेरीत धडक मारली असून, आता या दोन बलाढ्य संघांमध्ये विजेतेपदासाठी थरारक सामना रंगणार आहे.

माईर एमआयटी शिक्षण संस्था समूह, लातूर यांच्या वतीने आयोजित आंतर महाविद्यालयीन क्रीडा महोत्सवात व्हॉलीबॉल स्पर्धेस कै. बब्रुवान काळे मांजरा आयुर्वेदिक महाविद्यालय, लातूर (एमबीव्ही काळे) आणि एमआयपीटी फिजिओथेरपी महाविद्यालय, लातूर (एमआयपीटी) यांच्यातील सामन्याने सुरुवात झाली. या सामन्यात एमबीव्ही काळे संघाने प्रभावी सर्व्हिस, भक्कम बचाव आणि अचूक स्मॅशच्या जोरावर एमआयपीटी वर सरशी साधत विजयी सलामी दिली.

यानंतर जीएमसी आणि प्रयाग कराड कॉलेज ऑफ नर्सिंग, नांदगाव (पीकेसीएन) यांच्यातील सामना रंगला. जीएमसी संघाने सुरुवातीपासून आक्रमक खेळ करत प्रतिस्पर्ध्यांवर दबाव निर्माण केला. उत्कृष्ट ब्लॉकिंग आणि नेटजवळील नियंत्रणामुळे जीएमसी ने पीकेसीएन वर सहज विजय मिळवला.

तिसऱ्या सामन्यात एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय (एमआयएमएसआर) आणि एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाने (एमआयडीएसआर) यांच्यात जोरदार चुरस पाहायला मिळाली. दोन्ही संघांनी गुणांची अदलाबदल करत सामना रंगतदार केला. अखेर निर्णायक क्षणी एमआयएमएसआर संघाने संयम राखत विजय आपल्या नावावर केला.

चौथ्या सामन्यात एमआयएमएसआर समोर जीएमसी चे आव्हान उभे राहिले. हा सामना स्पर्धेतील सर्वाधिक उत्कंठावर्धक ठरला. दोन्ही संघांनी उत्कृष्ट बचाव आणि आक्रमणाचा सुरेख मिलाफ दाखवला. मात्र, शेवटच्या क्षणी जीएमसी संघाने निर्णायक गुण मिळवत सामना जिंकला आणि अंतिम फेरीत धडक मारली.

दिवसातील अखेरच्या सामन्यात एसव्हीएसएस आणि एमबीव्ही काळे आमनेसामने आले. एसव्हीएसएस संघाने सुरुवातीपासूनच आक्रमक भूमिका घेत प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व राखले. त्यांच्या समन्वयपूर्ण खेळामुळे एमबीव्ही काळे संघाला पुनरागमनाची संधी मिळाली नाही आणि एसव्हीएसएस ने विजय मिळवत अंतिम फेरीत स्थान निश्चित केले.

या स्पर्धेतील अंतिम आणि सर्वात महत्त्वाचा सामना एसव्हीएसएस आणि जीएमसी या दोन ताकदवान संघांमध्ये रंगणार आहे. दोन्ही संघांनी आतापर्यंत उत्कृष्ट कामगिरी करत अंतिम फेरी गाठली असून, त्यांच्या खेळातील वेग, ताकद आणि तांत्रिक कौशल्य पाहता अंतिम सामना अत्यंत चुरशीचा आणि उच्च दर्जाचा होणार आहे. या स्पर्धेसाठी पंच म्हणून श्री विक्रम पाटील व श्री मुनाळे यांनी काम पाहिले.

स्पर्धेचे धावते संचनल श्री परमेश्वर सोनवणे यांनी केले. यावेळी एमआयटी शिक्षण संकुल व विविध वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक व नागरिक मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

# दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील उत्कृष्ट ग्रंथ परीक्षण स्पर्धेत कु.पंकजा पांडुरंग कापसे प्रथम

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर येथील ग्रंथालय विभागामार्फत विद्यार्थ्यांच्या वाचनासोबतच लेखन कौशल्याला प्रोत्साहन देण्यासाठी ''उत्कृष्ट ग्रंथ परीक्षण'' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा ऑगस्ट २०२५ ते २८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत घेण्यात आली.

या स्पर्धेत महाविद्यालयातील एकूण १३९ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सहभागी विद्यार्थ्यांनी विविध विषयांवरील पुस्तके वाचून त्यावर १००० शब्दांपेक्षा अधिक शब्दांत परीक्षण लिहून ग्रंथालयात सादर केले. या कालावधीत विद्यार्थ्यांकडून एकूण ३१२ पुस्तकांचे परीक्षण ग्रंथालयात जमा झाले.

या स्पर्धेत कु.पंकजा पांडुरंग कापसे (एम. कॉम प्रथम) यांनी ''पैसे नव्हे तर पैशाचे मानसशास्त्र'' या पुस्तकाचे उत्कृष्ट परीक्षण लिहून प्रथम क्रमांक मिळविला. द्वितीय क्रमांक कु. पोरे धनश्री युवराज (बी.कॉम द्वितीय) यांनी ''द एव्हरीडे हिरो मॅनिफेस्टो'' आणि कु. लक्ष्मी बस्वराज कोडे (बी.कॉम प्रथम) यांनी ''महानायक'' या पुस्तकांच्या परीक्षणासाठी मिळविला. तृतीय क्रमांक कु.चैताली कुमार चिकटे (बी.सी.ए प्रथम) यांनी ''द सीक्रेट (रहस्य)'' आणि कु.मनीषा गजानन पवार (बी. कॉम प्रथम) यांनी ''सार्थ श्री ज्ञानेश्वरी'' या पुस्तकांच्या परीक्षणासाठी मिळविला.

या स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना स्नेहसंमेलन कार्यक्रमात मिमिक्री कलाकार श्री शिवपुत्र स्वामी यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी त्यांनी अशा वाचन व लेखन स्पर्धांची आवश्यकता अधोरेखित केली.

या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मन्नीकर, उपप्राचार्य डॉ. गणेश लहाणे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण तसेच वाणिज्य विभागप्रमुख डॉ. मनीषा अष्टेकर यांचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धेचे आयोजन ग्रंथपाल डॉ. विठ्ठल जाधव यांनी केले.

ग्रंथालयामध्ये सुमारे ४३,००० ग्रंथसंपदा उपलब्ध असून विद्यार्थ्यांना वर्षभर अवांतर वाचन व लेखनासाठी प्रोत्साहित केले जाते. विविध प्रकारचे साहित्य वाचन व परीक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाला चालना मिळत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी ग्रंथालय कर्मचारी लक्ष्मीकांत वाघ, सौ. जी. के. चौधरी, सौ. दुबे एस. ए., सौ. ललिता सेठीया, नागेश कुरे, तानाजी सुतार व विशाल कांबळे यासह सर्व कर्मचाऱ्यानी परिश्रम घेतले.

# मौजे साई येथील अवैध दारु विक्रीविरोधात उपोषण; माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या सूचनेनंतर प्रशासकीय हालचाली, उपोषणाची सांगता



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यातील मौजे साई येथे फोफावलेली अवैध दारु विक्री आणि त्यामुळे ढासळलेली कायदा-सुव्यवस्था सुधारण्यासाठी तरुण कार्यकर्ते श्री. सुरज दत्तात्रय पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौक, लातूर येथे २५ मार्चपासून सुरू केलेले उपोषण, प्रशासनाच्या आश्वासनानंतर २६ मार्च रोजी रात्री ८ वाजता मागे घेण्यात आले आहे.

साई गावात राजरोसपणे सुरू असलेल्या अवैध दारु विक्रीमुळे मद्यपींचा त्रास वाढला असून, महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर झाला आहे. या अवैध धंद्यांवर कायमस्वरूपी बंदी घालावी आणि दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, या प्रमुख मागण्यांसाठी श्री. सुरज पाटील उपोषण सुरू केले होते.

या उपोषणाची माहिती मिळताच राज्याचे माजी मंत्री तथा काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी तातडीने दखल घेण्याच्या सूचना दिल्या. त्यांच्या सूचनेनुसार काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्री. अभय साळुंखे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष श्री. संतोष देशमुख, श्री. राजकुमार

पाटील आणि पंचायत समिती सभापती श्रीकांत बैले यांनी उपोषणस्थळी भेट देऊन उपोषणकर्त्यांशी संवाद साधून, मागण्या जाणून घेतल्या. यानंतर याप्रश्नी जिल्हा प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी यावेळी लोकप्रतिनिधींनी केली.

दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर आणि संबंधित

विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत, अवैध व्यवसायांवर कडक कारवाई करण्याचे आश्वासन देण्यात आले. त्यानंतर श्री. सुरज दत्तात्रय पाटील यांनी आपले उपोषण सोडले.

यावेळी साई गावचे उपसरपंच अमोल पवार, बापूराव पवार, परमेश्वर पवार यांच्यासह मोठ्या संख्येने गावकरी आणि महिला उपस्थित होत्या. गावकरी आणि महिलांच्या आक्रमक पवित्र्यामुळे प्रशासनाला आता या अवैध धंद्यांविरुद्ध ठोस पावले उचलावी लागणार आहेत.

## सर्व धर्मियांचे श्रद्धास्थान, श्री साईबाबा



आपल्या भारतामध्ये सर्व जाती-धर्माचे लोक फार पूर्वीपासून एकत्रित व गुण्यागोविंदाने राहत आहेत. त्याप्रमाणे संत श्री साईबाबा हे एक असे संत होऊन गेले की, त्यांच्या जीवनाचा संबंध हिंदू व मुस्लिम या धर्माशी आला. अशी ही एक खरोखरीच रोमांचकारी घटना आपल्या महाराष्ट्रात घडून गेली.

श्री साईबाबा हे महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्हा म्हणजे आताचे अहिल्यानगर जिल्ह्यातील राहता तालुक्यातील शिर्डी या गावी एका लिंबाच्या झाडाखाली प्रगट झाले. ते नक्की कोणत्या दिवशी प्रगट झाले याबाबत कोणतीही निश्चित अशी तारीख किंवा तिथी नाही. इ.स. १८३८ साली चैत्र शुद्ध नवमी या दिवशी शिर्डी येथील एका लिंबाच्या झाडाखाली साईबाबा एका सोळा वर्षाच्या बालकरुपात प्रकट झाले असे मानले जाते. तो बालक तिथे थंडी असो, उन्हाळा असो, पावसाळा असो तेथेच बसलेला असायचा. लोक जे देतील तो ते खात असायचा.

पुढे हा बालक हिंदू ब्राह्मण कुळातील होता हे लोकांना समजले. अशा या बालकाचे संगोपन एका सुफी फकीर कुटुंबातील माणसांनी केले. यावरून हा बालक हिंदू की मुस्लिम असाही संभ्रम लोकांना पडू लागला. परंतु त्याचा वेश हा फकीरासारखा असायचा म्हणून त्याला लोक फकीर बाबा म्हणून लागले.

औरंगाबाद जिल्ह्यातील धुप गावात चांद नावाचा मुसलमान राहत होता. त्याची घोडी हरवली होती. दोन महिने त्याने शोधून पाहिले पण ती न मिळाल्यामुळे तो निराश झाला व स्वत:च्या गावाकडे जात होता. तेव्हा त्याने एका झाडाखाली एका फकीराला बसलेला पाहिला. फकिराने चांदला पाहिले व विचारले की तू इतका दु:खी का आहेस ? त्यावर चांद म्हणाला, माझी घोडी हरवली आहे. खूप शोधली पण ती सापडत नाहीये. काय करू बाबा ? त्यावेळी बाबा चिलीम ओढत होते. त्यावेळी त्यांनी डोळे बंद करून, आंतर्धान होऊन एकाग्रतेने पाहिले व म्हणाले, तू इथून पुढे जा व जवळच्या नाल्यात तपास कर. चांदला आश्चर्य वाटले. तो पुढे गेल्यावर पाहिले, तर नाल्यापाशी तेथे त्याची घोडी चरत होती. चांदला खूप आनंद झाला. तो घोडी घेऊन फकीरा जवळ आला. त्याने फकीर बाबाचे दर्शन घेतले. हा फकीर बाबा फारच चमत्कारिक संत आहे. मग त्याने फकीर बाबाला आपल्या घरी यायला विनंती केली. फकीर बाबा त्याच्याबरोबर त्याचे घरी काही काळ जाऊन राहिला.

शिर्डी गावामध्ये लग्नानिमित्त परगावहून वऱ्हाड आले होते. वऱ्हाड खंडोबाचे देवाजवळ म्हाळसापतीच्या शेतात एका झाडाखाली थांबले. त्यावेळी या धार्मिक वृत्तीच्या म्हाळसापतीने या फकीर बाबाला '' या साई ''असे म्हणून त्यांच्या पाया पडला. फकीर बाबांचा सत्कार केला. तेव्हापासून फकीर बाबा हे साईबाबा या नावाने प्रसिद्ध झाले. वऱ्हाड लग्न झाल्यानंतर धूप गावाला निघून गेले पण साईबाबा तिथेच शिर्डी मध्ये थांबले.

साईबाबांनी एका मोडक्या मशिदी मध्ये आपला स्वत:चा मुक्काम केला आणि तिचे नाव द्वारका माई

असे ठेवले. द्वारकामाई येथे रोज साईबाबांचे भजन कीर्तन आणि आरती होत असे बाबांचा चमत्कार बघून लोक त्यांच्याकडे आकृष्ट होत असत. परंतु याला काही मुसलमानांनी विरोध केला. पण बाबांना पाहताच त्यांचा विरोध मावळला. साईबाबा हिंदू आहेत की मुसलमान आहेत हे कोणालाच माहीत नव्हतं. परंतु साईबाबांचा अभ्यास मात्र हिंदू धर्म व तसेच मुस्लीम धर्मीयांचाही होता. लोकांना ते गीता वाचायला सांगत व तसेच कुराणचेही पठन करा असे म्हणत.

साईबाबांकडे कोणी आपले दु:ख सांगत असत. त्यावेळी बाबा म्हणत, अल्लाह मालिक है वो सब ठीक कर देगा. असे म्हणून तिथे भजन कीर्तन ते करायचे. कोणी मुसलमान आले तर बाबा कुराणची आयात वाचवून घेत असत. म्हणून लोकांना त्यांची जात नक्की कोणती हे माहित होईनासे झाले. परंतु बाबांनी एकदा सांगितले की मी पाथेरचा ब्राह्मण आहे. परंतु माझा सांभाळ एका मुस्लिम फकिराने केला आहे. साईबाबांनी द्वारकामाईत पेटवलेल्या धुनीची उदी म्हणजे भस्म रोग्यांना देत असत. त्यामुळे रोगांना बरे वाटत असे.

एकदा एका मामलेदारांनी त्यांच्या नात्यातील एका डॉक्टरांना बाबांचे दर्शनास येण्यास सांगितले. तेव्हा डॉक्टर म्हणाले मी मुसलमानांच्या पाया पडत नाही. तेव्हा मामलेदार म्हणाले, अहो फक्त दर्शन घ्या. आणि त्यांना बरोबर घेऊन गेले. काय आश्चर्य ! साईबाबांना पाहताच त्यांनी बाबांना साष्टांग नमस्कार केला. घरी परतल्यावर मामलेदारांनी डॉक्टरना विचारले. आपण तर बाबांना साष्टांग नमस्कारच घातला, हे कसं काय ? तेव्हा डॉक्टर म्हणाले, मला बाबांच्या मध्ये श्रीरामाचे दर्शन झाले.

साईबाबांकडे आलेल्या प्रत्येक भक्ताला स्वत:चा देव साईबाबांच्या मध्ये दिसायचा. कोणाला श्रीकृष्ण, मारुती, दत्तात्रय, कोणाला गणपती, तर कोणाला अक्कलकोट स्वामी. जसा त्याचा भाव त्या स्वरूपात त्यांना साईबाबा दिसायचे. साईबाबा साठी रोज भक्तगण वेगवेगळ्या प्रकारचे जेवण देत असत. परंतु बाबा मात्र झोळी भिक्षा पात्र घेऊन भिक्षा मागायचे व भक्तांकडून आलेले अन्न ते थोडे आपल्यासाठी ठेवायचे व बाकीचे भक्तामध्ये वाटायचे.

साईबाबांचे मुक्या प्राण्यावर खूप प्रेम असायचे. त्यांच्या सान्निध्यात आलेल्या गायी, कुत्रे, पक्षी सर्वांना बाबा काही ना काही खाण्यास देत असत. साईबाबा ब्रह्मज्ञानी होते. ते एकमेकांना प्रेमाने वागवीत असत व प्रत्येक जीवाला व प्राणीमात्राला समानतेने जपत असत.

एकदा तात्या नावाच्या एका भक्तांनी बाबांना विचारले, बाबा माझा मृत्यू केव्हा होईल ? बाबा म्हणाले, शके १८४० च्या अश्विन शुद्ध दशमीला. तात्याला वाटले की बाबा गमतीने बोलत आहेत. एके दिवशी तात्याला खूप ताप आला. तात्याला वाटले बाबांची भविष्यवाणी खरी ठरणार. म्हणून ते बाबांचे स्मरण करू लागले. परंतु विजयादशमीचा दिवस आला तेव्हा तात्याचा ताप उतरला आणि बाबांच्या अंगी खूप ताप भरला. सर्व भक्तगण चिंता करू लागले. परंतु बाबा म्हणाले आता माझा काळ पूर्ण झालेला आहे आणि त्यांनी आपला देह प्रसन्न चित्ताने त्याग केला. बाबांना त्यांचे भक्त अतिप्रिय होते. बाबांनी भक्तांचा मृत्यू आपल्या शरीरात घेतला व स्वत: देह त्याग केला. संत श्री साईबाबांचा त्रिवार जय जयकार असो.

-- अनिल जाधव, बार्शी

# धर्मांतरविरोधी कायद्याचे अस्त्र




जनार्दन पाटील

अनेक धर्म आणि भाषा असलेल्या आपल्या देशात घटनेने प्रत्येक नागरिकाला धर्मस्वातंत्र्याचा मूलभूत अधिकार दिला आहे; मात्र गेल्या काही वर्षांमध्ये कथित धर्मांतरावरून देशभर वाद निर्माण होत आहेत. भाजपचे सरकार असलेल्या अनेक राज्यांनी धर्मांतरविरोधी कायदे केले. आता महाराष्ट्रातही असा कायदा संमत झाला आहे.महाराष्ट्र सरकारने 'धर्मस्वातंत्र्य अधिनियम' नावाने धर्मांतरविरोधी कायदा तयार करून तो मंजूरही केला आहे. या कायद्यातजबरदस्ती, प्रलोभन, फसवणूक किंवा विवाहाच्या माध्यमातून धर्मांतर घडवून आणल्यास कठोर कारवाई करण्याची तरतूद आहे.

या कायद्यानुसार धर्मांतर करण्यापूर्वी संबंधित व्यक्तीने प्रशासनाला पूर्वसूचना देणे आवश्यक असेल. धर्मांतराच्या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी अधिकृत नोंदणीची व्यवस्था असेल. फसवणूक, दबाव किंवा प्रलोभन देऊन धर्मांतर घडवून आणल्यास कठोर शिक्षा होईल. नातेवाइकांना जबरदस्तीच्या धर्मांतराबाबत तक्रार करण्याचा अधिकार दिला जाईल. सरकारच्या मते हा कायदा समाजातील दुर्बल घटकांचे संरक्षण करण्यासाठी आणि जबरदस्तीच्या धर्मांतराला आळा घालण्यासाठी आवश्यक आहे.

धर्मांतरविरोधी कायद्याचे समर्थक काही ठळक मुद्दे मांडतात. धर्मांतराची प्रक्रिया पूर्णपणे स्वेच्छेने होणे अपेक्षित आहे; परंतु काही ठिकाणी आर्थिक मदत, शिक्षण, नोकरी किंवा विवाहाचे आमिष दाखवून धर्मांतर घडवून आणल्याच्या तक्रारी येतात. असे प्रकार रोखण्यासाठी कायद्याची गरज असल्याचे समर्थक सांगतात. गरीब, आदिवासी किंवा सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांवर दबाव टाकून धर्मांतर घडवून आणले जाते, अशीही काही संघटनांची भूमिका आहे. धर्मांतराच्या मुद्द्यावरून अनेकदा स्थानिक पातळीवर तणाव निर्माण होतो. कायदेशीर चौकट स्पष्ट असल्यास या प्रक्रियेत पारदर्शकता येईल आणि वाद कमी होतील, असा दावा केला जातो.

धर्मांतरविरोधी कायद्यावर गंभीर आक्षेपही घेतले जात आहेत. धर्म स्वीकारणे किंवा बदलणे हा व्यक्तीचा वैयक्तिक निर्णय आहे. या प्रक्रियेसाठी सरकारी परवानगी किंवा पूर्वसूचना आवश्यक ठरवणे म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्यावर मर्यादा आणणे, अशी टीका केली जाते. प्रलोभन, दबाव किंवा फसवणूक यासारख्या शब्दांच्या स्पष्ट व्याख्या नसल्यास कायद्याचा गैरवापर होण्याची शक्यता वाढते. नातेवाइकांना तक्रार करण्याचा अधिकार दिल्यामुळे वैयक्तिक निर्णयात बाह्य हस्तक्षेप वाढू शकतो. काही धार्मिक संस्थांच्या मते अशा कायद्यांमुळे अल्पसंख्याक समाजात असुरक्षिततेची भावना निर्माण होऊ शकते. ओडिशा, मध्य प्रदेश, गुजरात, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, उत्तर प्रदेश, झारखंड आणि कर्नाटक या राज्यांमध्ये असा कायदा आला आहे.मात्र या कायद्यांवरही वेळोवेळी टीका होत आली आहे. धर्मांतरविरोधी कायदे घटनेच्या कसोटीवरही तपासले जात आहेत. घटनेच्या कलम २५ अंतर्गत प्रत्येक नागरिकाला धर्मस्वातंत्र्याचा अधिकार दिला आहे. त्यामुळे धर्मांतरावर मर्यादा घालणारे कायदे या अधिकाराशी विसंगत आहेत का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. सर्वोच्च न्यायालयाने काही निर्णयांमध्ये स्पष्ट केले आहे, **(क्रमशः उद्याच्या अंकात)**

## रोगप्रतिकारक शक्ती वाढवणारे अन्न



डेलनाझ टी. चंदुवाडिया, मुख्य आहार-तज्ज्ञ, जसलोक हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर

आपल्या रोगप्रतिकारक शक्तीचे नियंत्रण ठेवणे हा आजारांपासून दूर राहण्याचा सर्वात सोपा मार्ग आहे - जसे कि सामान्य सर्दी आणि फ्लू.असे म्हटल्यावर, याचा अर्थ असा होत नाही की आपण आजारी पडणार नाही, याचा अर्थ असा की- जरी आपल्याला संसर्ग झाला तरी आपण संक्रमित प्रतिकारशक्ती असलेल्या एखाद्या व्यक्तीपेक्षा संक्रमणास चांगला प्रतिकार करू शकता.

व्हिटॅम सी:व्हिटॅम सी इम्यूनोन्यूट्रिशनच्या गेमेटमधील एक महत्त्वपूर्ण जीवनसत्व आहे. यामध्ये कार्ये करण्याची आणि मूलभूत संक्रमण रोखण्याची क्षमता आहे. व्हिटॅमिन फंक्शन्स घेण्याशिवाय- व्हिट सीमध्ये अँटीऑक्सिडेंट फंक्शन देखील असते. हे पेशीसंबंधी नुकसान आणि मुक्त मूलगामी निर्मितीस प्रतिबंध करते. लिंबू / संत्री / पेरू / आवळा / मिरपूडचा दररोज सेवन करा.

रंगीबेरंगी भाज्या:इंद्रधनुष्य रंगाची प्लेट आनंदी प्रतिरक्षा प्रणालीची गुरुकिल्ली आहे. रंगीबेरंगी फळे आणि सब्ज्यांमध्ये बरेच रंगद्रव्य असतात- क्लोरोफिल, अस्टॅक्सॅन्थिन, बीटा कॅरोटीन- या सर्वांमध्ये अँटीऑक्सिडंट गुणधर्म असतात आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्याचे काम करतात. बेल मिरपूड, हिरव्या, पिवळ्या, लाल कोबी, ब्रोकोली, बेरी.

हळद : प्राचीन काळापासून भारतीय जीवनशैलीने या मसाल्याचा जादुई वापर केला जात आहे. हळदी मध्ये कर्क्युमिन एक मजबूत रोगप्रतिकारक बूस्टर आहे. हे एंटी-इंफ्लेमेटरी, स्नायू शिथिल करणारे इ. म्हणून काम करते संधिवात आणि ऑस्टियोआर्थरायटीससाठी चांगले कार्य करते. हळदी दुध खाणे केंव्हाही उत्तम.

आले:आले एक प्रखर दाहक विरोधी आहे. जिंझरोल दाह कमी करणे, तीव्र वेदना, गले दुखणे आणि कोलेस्ट्रॉल कमी करण्याचे गुणधर्म देखील आहे.

निरोगी आतडे: ओटीसी अँटीबायोटिक्ससह- आपण अंतर्गत आतड्यांचा नाश करतो. चांगले संतुलित आतडे फ्लोरा ही रॉक-सॉलिड रोगप्रतिकारक शक्तीची गुरुकिल्ली आहे. प्रीबायोटिक आणि प्रोबायोटिक पदार्थांचा चांगला डोस दररोज आतड्यांमधील वनस्पती संतुलित ठेवण्यास आणि निरोगी रोगप्रतिकारक प्रणाली राखण्यास मदत करते.

बेरी:बेरी जीवनसत्त्वे आणि अँटिऑक्सिडेंट्सने भरलेली असतात. सर्व फळे आणि शाकाहारी पदार्थ मिळविण्यासाठी मौसमी फळे आणि भाज्यांचे सेवन करणे महत्वाचे आहे. अँटीऑक्सिडंट रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास मदत करतात.

# अरे वेड्या मना...



थकलेली माणसं , विजय तरवडे

काका रोजच्यासारखेच आरामात उठले. काकू आधी उठून योगासनांच्या वर्गाला गेली होती. छान गार हवा पडलेली; पण तरी प्रसन्न वाटत नाहीये. काहीतरी अशुभ घडलंय, अशी भावना छळतेय. काल रात्री झोप झाली नाही. मनावर एक विचित्र जाड सावली पसरलेली. दुखणारे अंग, खुपणारे मन.

देवाचे नाव घेत काका उठले. चहा करून घेतला. मग, आन्हिकांची मालिका सुरू. मोटर चालू केली, टाकी भरली. डस्ट बीनमधल्या कचर्याच्या काळ्या पिशव्या रस्त्यावर नेऊन कंटेनरमध्ये टाकल्या. दूध गरम करून ठेवले. आरामखुर्चीत बसून पुन्हा चहा घेत पेपर वाचला. आंघोळ झाली. कपडे बदलताना मनावर पसरलेल्या सावटाचा, खुलासा झालाच. थोड्या वेळापूर्वी आलेला मेसेज. विमलवहिनी गेली. थोड्या वेळापूर्वी. विमलवहिनी बरेच दिवस दवाखान्यात होती. दोन दिवसांपूर्वी आयसीयूत हलवली. काल रात्री झोप नव्हती. घाणेरडी स्वप्ने दिसत होती. तेव्हा ती देखील तिकडे मरणाशी झगडत असेल का? काकांचे काळीज पिळवटून निघाले.

काकांनी मनोजला फोन केला. मनोज म्हणजे त्यांच्या परिचयातला कॅबवाला. अरे बाबा निघायचे ना? अकरा वाजता अंत्यसंस्कार आहेत. पोचायला लागेल. कुठं जायचं? मघाशी सांगितले ना? आपल्याला शिरूरला जायचेय. निघ रे लवकर.

काकू योगासनांच्या वर्गावरून आलेली नाही. काकांनी तिला फोन लावला; पण लागला नाही. काका अस्वस्थपणे येरझारा घालत करवादत राहिले. मनोजची हाक आली, तेव्हा घाईघाईने खाली उतरले. मागच्या सीटवर बसले. मनोजने बागेसमोर गाडी थांबवली. योगासने करणार्यांचा गट पांगला होता. काकू त्यात नव्हत्या. आता थांबायला वेळ नाही. विमलवहिनी गेल्याचा निरोप तिला कळवायचा तरी कसा? स्वतःशी तणतणत त्यांनी काकूला मेसेज केला. ती घरी आल्यावर मेसेज पाहिल.

मनोज, दोघेच जाऊ. काही न बोलता मनोजने गाडीला वेग दिला. गाडी रस्ता कापत पुढे निघाली. काका पुन्हा-पुन्हा काकूचा नंबर लावत होते. फोन लागत नव्हता. गाडी एका हॉटेलपाशी थांबली.


काका, दोन घास खाऊन चहा आणि बीपीची गोळी घ्या. तुम्हाला इथले पदार्थ आवडतात ना?काका चमकले. या रस्त्याने शिर्डीला आठ वर्षांपूर्वी गेलो. नंतर जाणे झाले नाही; पण तेव्हा मनोज लहान होता. मला इथे आवडते हे त्याला कसे कळाले असेल? टेलीपथी? केव्हातरी जुन्या आठवणी निघाल्या असतील तेव्हा काकूने- किंवा मीच- सांगितलं असेल का?

मनोज काकांना घेऊन आत गेला. त्यांना न विचारता वेटरला नेमकी ऑर्डर दिली. काकांना इथले जे आणि जसे हवे तसे पुढ्यात आले. कमालच आहे. काका तुम्ही शांतपणे खा. चहानंतर गोळी घ्या. तुम्हाला अकराच्या आत नेतो; पण काकांचे खाण्यात मन कुठे लागतेय. काकूंना फोन लावू; पण फोन गाडीत राहिलाय. मनोज फोन आणायला गाडीपाशी गेला. काकांचा फोन वाजत होता. मनोजने फोन घेतला. फोनवर काकूच होत्या. त्यांचा निरोप ऐकला. मग, घाईघाईने फोन बंद करून हॉटेलमध्ये आला. काका वेगळ्या चिंतेत दिसत होते.

काय झालं, काका? बीपीच्या गोळ्या घरी राहिल्या. मी आणतो. त्याने मेडिकल स्टोअरमधून बीपीच्या आणि दुसरी एक गोळी आणली. काका, आज सॉलिड धावपळ केलीत. टेन्शन घेतलेत. आता आपल्याला नॉन स्टॉप जायचेय. आधी बीपीची गोळी घ्या आणि नंतर ही दुसरी अव्होमिन देखील घ्या. अर्धा तास डुलकी काढा.

विमलवहिनी म्हणजे माझी थोरली भावजय. लहानपणी मला तिने खूप जीव लावला. काका मनोजला विमलवहिनीच्या आठवणी सांगणार होते; पण बोलता बोलता त्यांचा डोळा लागून गेला. मनोजने एकदा आरशातून मागे पाहिले. त्याने गाडी डिव्हायडरच्या टोकापर्यंत पुढे नेली आणि सफाईदारपणे यू टर्न घेतला. मघाशी काकूंनी सांगितलेले- विमलवहिनी महिन्यांपूर्वीच गेली. त्यावेळी काका-काकूंना घेऊन तो या रस्त्यानेच गेला होता. याच हॉटेलमध्ये त्यांनी नाष्टा केला होता. काकांना इथे काय-काय आवडायचे हे त्यांनी चार-पाच वेळा सांगितलेले, म्हणूनच मनोजने त्यांना इथंच आणले होते. मघाशी काकू म्हणालेल्या जाऊबाई मागच्या महिन्यातच गेल्या. तरी तुला ते त्या रस्त्याने घेऊन निघालेत. त्यांना गोड बोलून सांभाळून घरी आण. घराजवळ आलास की फोन कर. मी खालीच थांबते. त्यांना ताबडतोब दवाखान्यात न्यायला हवे. मनोज वेगाने घराच्या दिशेने गाडी घेऊन चालला होता.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा




आपल्यापैकी बहुतेक महिलांना असे वाटते की कमी अन्न खाल्ल्याने वजन कमी होते. अनेकजन नाश्ता किंवा दिवसाचे कोणतेही मिल स्किप करतात? त्यांना असे वाटते की यामुळे त्यांना स्लिम आणि ट्रिम फिगर मिळवणे सोपे होईल. मात्र, असे अजिबात होत नाही. तंदुरुस्त राहण्यासाठी किंवा वजन कमी करण्यासाठी तुम्ही नाश्ता स्किप करत असाल तर त्याचे शरीरावर **(उद्याच्या अंकात)**

## २ Joke विनोद




बिल
हिशोब
मॅनेजर : अरे, कॅशिअर कुठं आहे? दिसत नाही तो!
प्यून : साहेब, ते रेसला गेले आहेत.
मॅनेजर : काय, रेसला?
प्यून : हो साहेब, हिशोबात बाकी फार वाढत होती ती बरोबर करण्यासाठी.

## ३ Message संदेश



Sardar: O Yaar Ab Kesi Tabyat Hai Tumhari.??
Pathan: Yara Doctor Ny Kaha Tha Tumhary Jism Me Khoon Ki Kami Hai Tum Tamatar Khao, Magar 300 Rupy Kilo Tamatar Ka Sun Ker To Hamara Baki Ka Khoon Bhi Khushk Ho Gaya Hai.. :..

## ४ Thought सुविचार




हे जग एक विसंगती आहे, व हे विश्व एक विरोधाभास आहे. **- केदार जोशी**

**संस्कृत सुभाषित**

दोन ओंडक्यांची होते - सागरात भेट -
एक लाट तोडी दोघा - पुन्हा नाही गाठ
अर्थ - आपल्या हातात काहीच नसते. एकत्र येणेही नाही आणि दूर जाणेही नाही. मग सुख-दु:खाचा हिशेब तरी कशाला?

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. श्रीरामाचा तेरा अक्षरी मंत्र
१०. अत्तराचा बोळा
११. दात घासण्याची पावडर
१२. सुसर
१३. कारखान्यातील मजूर
१५. भाऊबंदकी
१८. संगीतातील ठेका
२०. तापापूर्वीचे शहारे
२२. मत देणारा
२३. तफावत, अंतर
२४. गुरे बांधण्याचा लांब दोर
२५. मुलाची मुलगी
२६. फुरसत
२८. केर टाकण्याची जागा
३२. भिस्त
३३. माज
३४. ढग (हिंदी)
३६. पलंग, खाट
३८. सत्त्व
३९. चलनवलन
४०. स्वयंपाकाचे शास्त्र
४३. कापणे
४४. जन्म-मृत्यू
४५. विषमच्या विरुद्ध
४८. सावधानतेचा इशारा
५०. परिस्थिती
५२. सहाचा फटका
५४. पाण्याचे हवेत रुपांतर
५५. लोकांच्या मनातील विचार
५६. पाठीतील हाड
५७. केसातील कीडा
५८. अभिनेता
५९. प्रतिष्ठा
६०. वर्ष, साल
६१. प्राण्यांचे अस्त्र
६२. सुकवलेली काळी द्राक्षे
६४. रंग (इंग्रजी)
६५. समुद्र
६७. नसती जवळीक
६८. कपार
७१. मिठी
७२. वाळवी
७५. श्वापद, पशू
७६. अटीची भाषा
७७. घराची अरूंद ओसरी
७८. बहर, हंगाम

### उभे शब्द

१. धनवान
२. गवंडी
३. बाबापुता करणे
४. यमाचे राज्य
५. संताप, क्रोध
६. गोड्या पाण्यातील एक मासा
७. असह्य वेदना, भयंकर हाल किंवा दु:ख
८. पौर्णिमा
९. माया, प्रेम, जिव्हाळा
१०. पुष्कळ
१४. कान आणि डोळे यामधला भाग
१६. उणीव
१७. शूर
१९. मध
२१. गात्रात मदन असण्याचे वय
२४. गयवया करणे
२६. नेहमी
२७. नवरदेव
२९. बाहेरख्याली
३०. केरसुणी
३१. कोवळा अंकुर
३३. मोठा तीळ
३५. बारीकसारीक
३७. संगोपन
३८. कलावंत
४०. झाडाभोवतीचा कट्टा
४१. मजबूत, दणकट
४२. किरकोळ सामान
४६. अधिक महिना
४७. सुगंध
४९. अग्नी, वणवा
५१. हत्या
५३. आश्चर्याने सर्वत्र पाहणे
५५. खानेसुमारी
५६. महिरप
५९. मीन, मत्स्य
६३. गायीचे पिल्लू
६४. सैन्याचे कडे
६६. तर्क, ठोकताळा
६८. कोळशाची पूड
६९. भीती
७०. परीध
७१. चषक
७३. खाऊचा किंवा जेवणाचा
७४. शूर

### आडवे उत्तरे

१.श्रीराम जयराम जयजयराम १०.फाया ११.मंजन १२.मगर १३.कामगार १५.यादवी १८.ताल २०.रसकस २२.मतदार २३.फरक २४.दावणी २५.नात २६.सवड २८.कचराकुंडी ३२.मदार ३३.मद ३४.बादल ३६.चारपाई ३८.कस ३९.हालचाल ४०.पाककला ४३.कर्तन ४४.जननमरण ४५.सम ४८.खबरदार ५०.हालचाल ५२.षटकार ५४.वाफ ५५.जनमानस ५६.मणका ५७.ऊ ५८.नट ५९.मान ६०.सन ६१.नख ६२.मनुका ६४.कलर ६५.सागर ६७.लगट ६८.खबदाड ७१.कव ७२.कसर ७५.जनावर ७६.जरतर ७७.पडवी ७८.बार

### उभे उत्तरे

१.श्रीमंत २.राज ३.मनधरणी ४.यमलोक ५.राग ६.मरळ ७.यमयातना ८.राका ९.ममता १०.फार १४.गालफड १६.ददात १७.वीर १९.मकरंद २१.सतरा २४.दादाबाबा करणे २६.सदा २७.वर २९.चवचाल ३०.कुंचा ३१.डीर ३३.मस ३५.लहानसहान ३७.पालनपोषण ३८.कलाकार ४०.पार ४१.कणखर ४२.सटरफटर ४६.मलमास ४७.सुवास ४९.दावानल ५१.हनन ५३.टकामका ५५.जनगणना ५६.मखर ५९.मासा ६३.कालवड ६४.कटक ६६.अंदाज ६८.खर ६९.डर ७०.घेर ७१.कप ७३.डबा ७४.वीर


# चंदेरी दुनिया



## धनंजय मानेंवरही धुरंधरची क्रेझ, सोशल मिडियावर घातला धूमाकूळ

बॉलिवूडचा'धुरंधर' २ सिनेमा सध्या बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. या सिनेमातील काही सीन सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरलही होत आहेत. विशेष म्हणजे या सिनेमातील अभिनेता रणवीर सिंहचा शेवटचा सीन अतिशय भावुक करणारा आहे. सिनेमातील रणवीरचा हा सीन पाहून अनेकांच्या डोळ्यात पाणी आलं आहे.

पण, सोशल मीडिया कंटेंट क्रीएटर सुमित पाटील यानं एक आगळीवेगळी शक्कल लढवत 'धुरंधर'मधील हा सीन आणि मराठी प्रेक्षकांचा जीव की प्राण असलेला 'अशी ही बनवाबनवी' सिनेमातील काही पात्रांसह एक वेगळाच व्हिडीओ तयार केला आहे. या व्हिडीओनं सध्या सोशल मीडियावर धुमाकूळ घातला असून हा व्हिडिओ प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला आहे.



या व्हिडीओत सुमितने 'धुरंधर' सिनेमातील त्या भावुक सीनचा आधार घेतला आहे, जेथे रणवीर सिंग आपल्या मिशननंतर मायदेशी परततो. पण यात त्याने 'अशी ही बनवाबनवी' मधील अशोक सराफ (धनंजय माने), सुधीर जोशी (विश्वासराव) आणि लता थत्ते (मालकीण) यांच्या पात्रांचा वापर केला असून यामध्ये त्यानं अशोक सराफ यांनी साकारलेल्या धनंजय मानेचं पात्र रणवीरच्या जागी दाखवलंय.- खच्या मदतीने तयार केलेल्या



या व्हिडीओमध्ये 'उ्हरपरपवहरी माने इथेच राहत होते' अशा आशयाचे मजेशीर टेक्स्ट वापरण्यात आले आहे. तसेच घरमालक, जुनी केरसुणी आणि ७० रुपयांच्या हिशोबावरून केलेले भाष्य पाहून आजही प्रेक्षकांना हसू आवरता येत नाहीय.या रीलवर प्रेक्षकांनी कमेंट्सचा पाऊस पाडला असून एका युजरने उपरोधिकपणे म्हटलंय की, इस्राइलहून औषधं आणणं आता थोडं कठीण आहे, तर दुसऱ्यानं अशोक मामांचं कौतुक करत महाराष्ट्रचे अशोक मामा... ऑल टाइम फेव्हरेट अशी कमेंट केली आहे. अनेकांनी हा व्हिडीओ पाहून हसून हसून डोळ्यात पाणी आल्याचं म्हटलं आहे.

मराठी प्रेक्षकांसाठी रणवीरच्या 'धुरंधर'पेक्षा अशोक सराफ यांनी साकारलेला 'धनंजय माने' अर्थात 'धनंधर' नेहमीच वरचढ असेल. हे या व्हिडीओतून सिद्ध झाले आहे. एआयचा वापर करून बनवलेला हा 'कॉमेडी व्हिडिओ सध्या सोशल मिडियावर जोरदार व्हायरल होत आहे.

## माधुरी दीक्षितच्या सौंदर्याची सर्वांना भुरळ, या गोष्टींमुळे अजूनही दिसते इतकी सुंदर

अभिनेत्री माधुरी दीक्षित ५८ वर्षांची असूनही माधुरीच्या सौंदर्यांची भुरळ अनेकांना पडत आहे. माधुरी दीक्षितची सुंदरता आणि फिटनेसमुळे तिच्या वयाचा अंदाजही लावता येत नाही. चला तर जाणून घेऊयात माधुरी दीक्षितच्या परफेक्ट सुंदरतेचं नेमकं रहस्य काय आहे?

माधुरी दीक्षितचं स्किनकेअर रुटीन

संतुलित आहार : रणवीरच्या एका शो दरम्यान माधुरीनं सांगितलं की नेहमी हेल्दी आहाराचं सेवन करणं महत्वाचं आहे. यामुळे आपल्या त्वचेचं आरोग्य चांगलं राहण्यास मदत होते.

हायड्रेशन : आपल्या चेहऱ्यासाठी हायड्रेशन खुप महत्वाचं आहे. त्यामुळे चेहऱ्यावर ग्लो येण्यासाठी भरपूर प्रमाणात पाणी प्यावं.

स्किनकेअर रुटीन : अभिनेत्री माधुरी दीक्षित चेहऱ्यावरील ग्लो वाढवण्यासाठी स्किनकेअर रुटीनचं पालन करते. यामध्ये क्लींझिंग, टोनिंग, सीरम आणि मॉइस्चरायझिंगचा समावेश आहे.

मानसिक शांती : माधुरी दीक्षित स्किनकेअरसोबतच नियमितपणे मेडिटेशन करण्यालाही महत्व देते. हे आपल्या त्वचेसाठी फायदेशीर ठरतं.

सकारात्मक दृष्टिकोन : एका शो दरम्यान माधुरी दीक्षितनं सांगितलं की ती नकारात्मक विचारांपासून दूर असते. ती नेहमी स्वत:ला आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करते. यामुळे आपलं ब्लड सर्क्यूलेशन वाढत ज्यामुळे आपल्या चेहऱ्यावर नैसर्गिक चमक येते.

कोण आहे माधुरी दीक्षित ?

भारतीय चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री माधुरी दीक्षित नेने हिचा जन्म १५ मे १९६७ रोजी मुंबईत झाला. माधुरीला 'धक धक गर्ल' आणि 'बॉलिवूडची डान्सिंग क्वीन' म्हणून ओळखले जाते. माधुरी एक प्रशिक्षित कथ्थक नृत्यांगना आहे. तिनं सुमारे आठ वर्षे नृत्याचे शिक्षण घेतले आहे. आजही मनमोहक हास्य, लक्षवेधी नृत्य आणि कौतुकास्पद अभिनय यामुळे माधुरीच्या चाहत्यांची संख्या मोठी आहे. डॉ. श्रीराम नेने यांच्याशी लग्न केलेल्या माधुरीला अरिन आणि रायन अशी दोन मुले आहेत.



बॉलिवूडची धक-धक गर्ल अर्थात माधुरीनं १९८४ मध्ये 'अबोध' चित्रपटातून अभिनयाची सुरुवात केली. 'तेजाब', 'राम लखन', 'बेटा', 'हम आपके हैं कौन' आणि 'दिल तो पागल है' यांसारख्या अनेक सुपरहिट चित्रपटांत तिनं काम केलं आहे. माधुरीला उत्कृष्ट अभिनयासाठी अनेक 'फिल्मफेअर' पुरस्कार मिळाले आहेत.

## अमिषा पटेलनं धुरंधर २ सिनेमाचं केलं कौतुक, बॉलिवूड इडंस्ट्रीला दिला हा सल्ला


मुंबई - धुरंधर २ सिनेमानं जगभरात धूमाकूळ घातला आहे. प्रेक्षकांपासून अनेक कलाकारांनी या सिनेमाचं भरभरून कौतुक केलं आहे. यामध्ये आता आणखीन एका अभिनेत्रीची भर पडली असून या अभिनेत्रीनं रणवीरच्या धुरंधर सिनेमाला डोळे उघडणारा सिनेमा म्हणत सिनेमाचं जोरदार कौतुक केलं आहे.

तिने सिनेमामध्ये इन्फ्लुएन्सर्सना कास्ट करण्याबाबतही आपलं मतं व्यक्त केलं आहे.

धुरंधर २ सिनेमाचं कौतुक करत बॉलिवूड अभिनेत्री अमिषा पटेलनं आपल्या सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे.

या पोस्टमध्ये अमिषानं लिहिलं आहे की डोळे उघडणारी गोष्ट. इंडस्ट्री धुरंधरची प्रशंसा करत आहे, सिनेमा प्रशंसेस पात्र आहे. इंडस्ट्रीनं हे लक्षात घ्यायला हवं की आदित्य धरने एक प्रोजेक्ट नाही, तर एक सिनेमा बनवला आहे. त्याने कलाकारांना कास्ट केलं आहे, पार्ट्यांमध्ये ट्रेंड होणाऱ्या इन्स्टाग्रामर्सना नाही. प्रोजेक्ट्स बनवणं थांबवा आणि सिनेमा बनवायला सुरुवात करा.

धुरंधर २ सिनेमा १९ मार्च २०२६ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला आला. प्रदर्शनाच्या पहिल्या दिवसापासूनच धुरंधर २ सिनेमानं जगभरात धूमाकूळ घातलाय. प्रदर्शित झाल्यापासून धुरंधर २ हा सिनेमा उत्तम कमाई करत असून अवघ्या सहा दिवसांत या सिनेमानं ९०० कोटींचा टप्पा पार केला आहे. जगभरात धुरंधर २ ची एक वेगळीच क्रेझ पाहायला मिळत आहे.



## सुरु होणार भक्तीचं महापर्व; संत सखुबाई घेणार जलसमाधी

मुंबई : 'सन मराठी'वरील 'सखा माझा पांडुरंग' मालिकेत प्रेक्षकांना लवकरच एक अत्यंत भावनिक आणि थरारक भाग पाहायला मिळणार आहे. सखु दिगूचे प्राण वाचवते, पण या गोजी गावकऱ्यांमध्ये भीती पसरवतो आणि झिंग्रोबाचा कोप दाखवत सखुवर अमानुष अत्याचार करतो. तरीही सखु कोणत्याही परिस्थितीत विठोबाची भक्ती सोडायला तयार होत



घटनेचे श्रेय झिंग्रोबाला द्यावे म्हणून मनोरमा आणि नागोजी एक मोठे कारस्थान रचतात. सखुला अंधारात ठेवून झिंग्रोबाच्या पूजेची तयारी केली जाते, मात्र सत्य समजल्यावर सखु ठामपणे नकार देत सर्वांसमोर विठुरायावरचा तिचा अढळ विश्वास व्यक्त करते.यामुळे संतापलेला ना- नाही. तिची ही न डगमगणारी श्रद्धा पाहूनही नागोजी थांबत नाही आणि अखेर सखुला तिच्या लाडक्या विठोबाच्या मूर्तीसह तळ्यात बुडवण्याचा निर्णय घेतो. या जलसमाधीच्या प्रसंगात सखु आपल्या विठुरायाला कवटाळत मृत्यूला सामोरी जाते.आता विठुराया सखूला या प्रसंगातून कशाप्रकारे बाहेर

## बॉलीवूडचा परफॉर्मर अक्षय खन्नाचा ५१ वा वाढदिवस

### अकाली टक्कल पडल्यामुळे चित्रपत्र निर्मात्यांना विसर तरीही..

अनेक वर्षांच्या विश्रांतीनंतर अक्षय खन्नाने इत्तेफाक, मॉम, छावा, दृश्यम २, धुरंधर या चित्रपटांमधून दमदार कमबॅक केले आहे. प्रेक्षकांनी त्याला म्हटले आहे. आज बॉलीवूडचा अत्यंत प्रभावशाली आणि उत्कृष्ट अभिनेता अक्षय खन्नाचा ५१ वा वाढदिवस आहे. २८ मार्च १९७५ रोजी अक्षय खन्नाचा जन्म झाला होता. अक्षय खन्नाने बॉर्डरमधील धर्मवीर असो वा दिल चाहता है मधील सिड आपल्या उत्कृष्ट अभिनयाने प्रक्षेकांच्या मनावर राज्य केले. सध्या अक्षय खन्ना सर्वांचा अवडता अभिनेता बनला आहे. त्याच्या जीवनात अनेक चढ-उतार आले. त्याने दीर्घ विश्रांतीनंतर दृश्यम २ आणि २०२५ मधीवल धुरंधर व छावा या चित्रपटांमधून धमाकेदार कमबॅक केला. धुरंधर चित्रपटात रहमान डैकत नावाचे खलनायकाचे पात्र त्याने अत्यंत प्रभावीपणे साकारले. सध्या त्याचे हे पात्र प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य करत आहे.

कमी वयातच पडलं टक्कल, इंडस्ट्रीने केलं दुर्लक्ष, छावामधल्या औरंगजेबामुळे चर्चेत आलेल्या अक्षय खन्नाची संपत्ती किती?

छावा सिनेमात औरंगजेबाची भूमिका साकरुन चर्चेत आलेल्या अक्षय खन्नाचा आज ५० वा वाढदिवस आहे. त्यानिमित्त त्याच्या करियरचा पडता काळ तसेच संपत्ती किती ते जाणून घेऊ मुंबई- अक्षय खन्ना आज त्याचा ५० वा वाढदिवस साजरा करत आहे.

सध्या अक्षय त्याच्या छावा सिनेमातल्या औरंगजेब या भूमिकेसाठी चर्चेत आहे. इंडस्ट्रीत गेले काही वर्ष सक्रिय नसलेला अक्षय ऍरंगजेबाच्या पात्रामुळे अचानक प्रसिद्धीच्या झोतात आला. यापूर्वी मदिल चाहता हैफ्ना मसिडफ असो किंवा मतालफ्ना ममानव मेहताफ या अभिनेत्याने प्रत्येक भूमिकेतून स्वतःची वेगळी छाप सोडली होती. मीडियापासून दूर राहणाऱ्या अक्षयचा स्वभाव अतिशय स्पष्ट आहे. पण एक काळ असा होता की त्याचा आत्मविश्वास हरवला होता. त्याचे गळणारे केस आणि अकाली टक्कल पडणे ही त्यामागची कारणे होती.

स्टार प्रवाहच्या लोकप्रिय सासूची मालिकेतून तडकाफडकी एळीं, आता दिसणार ही अभिनेत्री

खुद्द अक्षयला हे मान्य करायला दहा वर्षे लागली. अभिनेता म्हणाला- याची सुरुवात अगदी लहान वयात झाली. माझ्यासाठी अकाली टक्कल पडणे म्हणजे एखाद्या पियानोवादकाची बोटे गमावल्यासारखे होते. त्या दिवसांत मला खरंच तसं वाटलं होतं... हे घडत असताना मी कमी लक्ष देत होतो. अक्षय म्हणाला- तुम्ही एक खेळाडू होऊ शकता ज्याला गुडघ्याच्या शस्त्रक्रियेची गरज आहे. हे खूप वेदनादायी आहे. तुम्ही तुमच्या कारकिर्दीतील एक किंवा दोन वर्ष गमावू शकता.

आत्मविश्वास गमावला होता.

> कमी वयात टक्कल
> २००७ मध्ये कॉफी विथ करण या चॅट शोमध्ये पाहुणा म्हणून आलेल्या अक्षय खन्नाने आपले ब्रेक आणि केस गळण्याच्या चर्चेकडे दुर्लक्ष केले. पण १० वर्षांनंतर, त्याने आपल्यामध्ये किती फरक पडला हे उघड केले. टक्कल पडण्याचा त्याच्यावर किती प्रमाणात परिणाम झाला आहे हे सांगता येत नाही, असे त्याने सांगितले होते.

अक्षय पुढे म्हणाला होता - अभिनेता म्हणून तुम्ही कसा दिसता हे खूप महत्वाचे आहे. वयाच्या १९-२० व्या वर्षात हे सर्वात निराशाजनक आहे. मी वैतागलो होतो. माझे मन तुटले होते, ते मानसिकरित्या दुखत होते. ही भावना तुमचा जीवही घेऊ शकते. या टक्कल पडल्यामुळे माझा आत्मविश्वास दुखावला होता. एक तरुण अभिनेता म्हणून मी माझा आत्मविश्वास गमावला होता, मी कबूल करू शकलो नाही यापेक्षा मला जास्त त्रास झाला होता.



अक्षय खन्ना हा दिग्गज अभिनेते विनोद खन्ना यांचा मुलगा आहे. अक्षयने हिमालय पुत्र या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. पण कालांतराने तो टक्कल पडण्याचा शिकार होऊ लागला. यानंतर अभिनेत्याने दोन वर्षांचा ब्रेक घेतला. पण त्यानंतर २००१ मध्ये त्याने दिल चाहता है या चित्रपटाने धमाकेदार पुनरागमन केले. अक्षयच्या करिअरमध्ये अनेक चढ-उतार आले. २०१२ मध्ये त्याने चार वर्षांचा ब्रेक घेतला आणि नंतर डिशूममधून पुनरागमन केले. अक्षय मदृश्यम २फ मध्येही दिसला होता. या चित्रपटात त्याच्यासोबत तब्बू आणि अजय देवगण मुख्य भूमिकेत होते.

अभिनयाची छाप सोडणारा अभिनेता अक्षय खन्ना पण आता छावा सिनेमाने अक्षयचे आयुष्यच बदलले. अक्षयवर प्रेक्षक कितीही राग व्यक्त करत असले तरीही ही त्याचा कामाची पोचपावती आहे. अक्षयच्या संपत्ती बद्दल बोलायचे झाल्यास १६७ कोटी रुपये त्याचे नेटवर्थ आहे. या अभिनेत्याची मुंबई, दिल्ली आणि पुण्यात मालमत्ता आहे. त्याच्याकडे ऑडी, बीएमडब्ल्यू आणि होंडा सीआर-व्ही सारख्या गाड्या आहेत. मछावाफ चित्रपटासाठी या अभिनेत्याने २.५ कोटी रुपये इतके मानधन घेतले आहे.

## मराठी रंगभूमीवर आता चालणार 'दाभोळकरी पॅटर्न

मुंबई: अनेक दशके इंग्लिश, हिंदी आणि गुजराती रंगभूमीवर अधिराज्य गाजवणारे, 'हिंग्लिश' नाटकांचे प्रणेते आणि प्रसिद्ध 'ॲड गुरु' भरत दाभोळकर प्रथमच मराठी रंगभूमीवर लेखक-दिग्दर्शक आणि अभिनेता म्हणून एक आगळेवेगळे नाटक घेऊन येत आहेत. 'सवाईगंधर्व' निर्मित 'कॅरी ऑन स्पायगिरी' हे नाटक लवकरच रसिक प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

इंग्रजीतील गाजलेलं नाटक आता मराठमोळ्या ढंगात : आतापर्यंत भरत दाभोळकर यांनी पु.ल. देशपांडे, वसंत कानेटकर, जयवंत दळवी यांसारख्या दिग्गज मराठी लेखकांची नाटकं इंग्रजीत नेली आणि ती गाजवली. अनेकदा हलके-फुलके विषय घेऊन स्वतः दाभोळकरांनीही आपल्या लेखन-दिग्दर्शनाने हिन्दी, इंग्रजी, गुजराती प्रेक्षकांचे मनोरंजन केले. यावेळीही ते स्वतःचं मूळ इंग्रजी नाटक मराठीत घेऊन येत आहेत. यापूर्वी इंग्रजीत हे नाटक विजू खोटे, किशोर प्रधान, विहंग नायक, वृषाली गोखले, अतुल परचुरे, अतुल काळे यांसारख्या दिग्गज कलाकारांनी हे नाटक अजरामर केले होते. आता हेच नाटक मराठीत आणण्याचे धाडस निर्माते आकाश भडसावळे यांनी केले आहे.

आता 'मराठमोळं' कुटुंब पाकिस्तानात! : मूळ इंग्रजी नाटकात एक गुजराती कुटुंब दाखवण्यात आले होते, मात्र मराठी प्रेक्षकांची नस ओळखून लेखनात महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. नाटकाचा मूळ गाभा तोच ठेवून संपूर्ण नाटक आता 'मराठमोळ्या' पद्धतीने सादर होणार आहे. भरत दाभोळकर म्हणतात, मराठीत आतापर्यंत विनोद, सस्पेन्स आणि ऐतिहासिक नाटकं प्रेक्षकांनी डोक्यावर घेतली आहेत. इंटरनेटमुळे आजच्या पिढीला जगभरातील गोष्टी ठाऊक आहेत. अशातच एखादं मराठमोळं कुटुंब जेव्हा पाकिस्तानात जातं, तेव्हा तिथे उडणारी त्यांची धांदल आणि तो 'ॲडव्हेंचरस' प्रवास पाहायला प्रेक्षकांना नक्कीच आवडेल.

भन्नाट टीम आणि भन्नाट अनुभव : या नाटकाच्या निमित्ताने भरत दाभोळकर आणि अभिनेते-निर्माते आकाश भडसावळे ही जोडी एकत्र आली आहे. आकाशबद्दल बोलताना दाभोळकर सांगतात की, आकाश हा एक अत्यंत ऑर्गनाइज आणि प्रो-ॲक्टिव्ह प्रोड्युसर आहे, त्याच्यासोबत काम करण्याचा अनुभव खूपच छान आहे. या नाटकात भरत दाभोळकर यांच्यासोबत त्यांचे इंग्लिश-हिन्दी नाटकातील अनेक वर्षांचे जुने सहकारी आणि ज्येष्ठ अभिनेते मोहन आझाद ही जोडी पुन्हा एकदा रंगमंचावर कमाल करताना दिसेल.

ओटीटीला कंटाळलेला प्रेक्षक आता नाटकाकडे! : सध्या मराठी नाटकांना मिळणारा प्रतिसाद अत्यंत उत्साहवर्धक आहे. भरत दाभोळकर यांच्या मते, जेव्हा मराठी माणूस ओटीटीवरील साचेबद्ध कंटेट पाहून कंटाळतो, तेव्हा तो ताज्या दमाच्या अनुभवासाठी नाटकाकडे वळतो. म्हणूनच 'कॅरी ऑन स्पायगिरी' सारखा हलका-फुलका आणि साहसी विषय प्रेक्षकांसाठी एक पर्वणी ठरेल.

शुभारंभाचे प्रयोग: १० एप्रिल २०२६ रोजी श्री शिवाजी मंदिर नाट्यगृह, दादर, मुंबई. तर १८ एप्रिल २०२६ रोजी बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे या नाटकाचे शुभारंभाचे प्रयोग होणार आहेत. अस्सल 'दाभोळकरी' शैलीतील हे स्पाय-कॉमेडी नाटक मराठी रंगभूमीवर एक नवा इतिहास घडवण्यासाठी सज्ज झाले आहे.



# बॅडमिंटन स्पर्धेत विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे वर्चस्व

## विश्वमैदान २०२६ : साई कृष्णा व नेहाल शाह चमकले; जीएमसी व एमआयडीएसआर यांच्यात अंतिम लढत



**लातूर/प्रतिनिधी :** माईर एमआयटी शिक्षण संस्था समूह, लातूर यांच्या वतीने आयोजित 'विश्वमैदान २०२६' आंतर महाविद्यालयीन क्रीडा महोत्सवात पहिल्याच दिवशी रंगलेल्या बॅडमिंटन स्पर्धेत विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाने (व्हीडीजीएमसी) दमदार कामगिरी करत उपांत्य फेरीपर्यंत आपले वर्चस्व सिद्ध केले. साई कृष्णा आणि नेहाल शाह यांच्या उल्लेखनीय खेळाच्या जोरावर जीएमसी संघाने विविध गटांत विजयांची मालिका कायम ठेवली.

दुसरीकडे एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाने (एमआयडीएसआर) देखील गजानन वाघमोडे यांच्या नेतृत्वाखाली प्रभावी खेळ सादर करत अंतिम फेरीतील आपले स्थान निश्चित केले. त्यामुळे आता जीएमसी आणि एमआयडीएसआर यांच्यात अंतिम लढत रंगणार आहे.

स्पर्धेच्या प्रारंभी एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ. यतिश कुमार जोशी आणि एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष खत्री यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व श्रीफळ वाढवून उद्घाटन करण्यात आले. यावेळी स्पर्धा संयोजिका डॉ. वर्षा सांगळे, सहसंयोजक डॉ. सुजित झाडके, डॉ. गोपाळ नागरगोजे, क्रीडा शिक्षक बालासाहेब शेप, प्रतिक्षा कसबे यांच्यासह आयोजन समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

पहिल्याच दिवसाच्या सामन्यांमध्ये वेग, अचूकता आणि कौशल्याचा उत्कृष्ट संगम पाहायला मिळाला. मुलांच्या एकेरी गटात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या साई कृष्णा यांनी श्री वेताळेश्वर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, लातूर (एसव्हीएसएस) च्या ऋतेश धवळे तसेच कै. बब्रुवान काळे मांजरा आयुर्वेदिक महाविद्यालय, लातूर (एमबीव्ही काळे) च्या आर्यन कलशेट्टी यांच्यावर मात करत आपली दावेदारी भक्कम केली. त्याच गटात एमआयडीएसआर च्या गजानन वाघमोडे यांनी एमआयपीटी फिजिओथेरपी महाविद्यालय, लातूर (एमआयपीटी) च्या सारंग देशमुख यांना पराभूत करून लक्ष वेधून घेतले.

मुलींच्या एकेरी गटात देखील चुरशीचे सामने रंगले. एसव्हीएसएस च्या रोहिणी पाचंगे यांनी प्रयाग कराड कॉलेज ऑफ नर्सिंग, नांदगाव (पीकेसीएन) च्या संभोधी कांबळे यांच्यावर विजय मिळवला. तर जीएमसी च्या नेहाल शाह यांनी एमआयडीएसआर च्या साक्षी भिसे आणि एलबीव्ही काळे च्या क्षितिजा यांना पराभूत करत प्रभावी खेळाचे दर्शन घडवले. एमआयपीटी च्या रिया पाटील हिनेही पीकेसीएन च्या संभोधी कांबळे हिच्यावर विजय मिळवत आपली छाप पाडली.

मुलांच्या दुहेरी गटात एमआयडीएसआर च्या गजानन वाघमोडे व शशांक सांगळे या जोडीने सलग दोन विजय मिळवत आपली ताकद सिद्ध केली. तर जीएमसी च्या साई कृष्णा व उत्कर्ष नांदगरे या जोडीनेही सातत्यपूर्ण आणि समन्वयपूर्ण खेळ करत विजयांची नोंद केली.

मुलींच्या दुहेरी गटात एमआयडीएसआर च्या सुम्या शास्त्री व अपूर्वा पानसकर यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजय संपादन केला. त्याचबरोबर जीएमसी च्या नेहाल शाह व प्रणिता जाधव या जोडीने एमआयपीटी आणि वसंतराव काळे होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय, लातूर (व्हीकेएचएमसी) संघांवर मात करत आपले वर्चस्व कायम राखले. पीकेसीएन च्या संभोधी कांबळे व दिपाली गरोळे यांनीही एक विजय मिळवत स्पर्धेत आपली उपस्थिती अधोरेखित केली.

मिश्र दुहेरी गटात एमआयडीएसआर च्या रोहित ऐतवाडे व सुम्या शास्त्री या जोडीने विजय मिळवून दमदार सुरुवात केली. मात्र या गटातही जीएमसी च्या नेहाल शाह व साई कृष्णा या जोडीने एमआयपीटी आणि एसव्हीएसएस संघांवर सलग विजय मिळवत आपला दबदबा कायम राखला.

पहिल्या दिवसाच्या स्पर्धेत जीएमसी संघाचे सर्व गटांमध्ये वर्चस्व दिसून आले, तर एमआयडीएसआर संघानेही तितकेच कडवे आव्हान उभे केले. त्यामुळे अंतिम सामन्यात या दोन बलाढ्य संघांमध्ये रंगणाऱ्या लढतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या स्पर्धेसाठी श्री अविनाश अडसुळ, श्री आशिष इंगोले, श्री कृष्णा अडसुळ, ऋषभ करंजकर आणि रमन सय्यद यांनी पंच म्हणून काम पाहिले. कार्यक्रमाचे धावते संचलन श्री परमेश्वर सोनवणे यांनी केले. यावेळी एमआयटी शिक्षण संकुलातील विद्यार्थी, विविध वैद्यकीय महाविद्यालयांतील खेळाडू, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी व दयानंद इंस्टीट्यूट ऑफ फार्मसीचे झील २०२६ स्नेहसंमेलन जल्लोषात संपन्न




**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्था लातूर द्वारा संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी व दयानंद इंस्टीट्यूट ऑफ फार्मसी यांचे दि.२६ व २७ मार्च रोजी '' झील २०२६ '' हे संयुक्त वार्षिक स्नेहसंमेलन नुकतेच संपन्न झाले. कार्यक्रमाचे उद्घाटक व प्रमुख पाहुणे म्हणून लातूरचे सुप्रसिद्ध लेखक व कवी भारत सातपुते हे उपस्थित होते.स्नेहसंमेलनाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन करून झाले.

या प्रसंगी प्रमुख पाहुण्यांचे शाल,स्मृतिचिन्ह देऊन प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते व प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस यांनी स्वागत केले. मंचावर शैक्षणिक विभाग प्रमुख डॉ.समीप सोनवणे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.गोपाल लोहिया, शैक्षणिक विभाग प्रमुख प्रा.अरुण कोंडापुरे,सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. अविनाश चौधरी,विद्यार्थी प्रतिनिधी यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते यांनी केले.या प्रसंगी प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते महाविद्यालयाच्या प्रगती बाबत व विद्यार्थ्यांच्या विविध क्षेत्रातील यशा बाबत माहिती दिली.

स्नेहसंमेलन प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित लोकप्रिय कवी भारत सातपुते यांनी तरुण पिढीला संबोधित करताना म्हणाले.माणसाच्या गावात माणुसकी महत्वाची असते. आणि जीवनात आई नावाची शाळा सगळ्यात ग्रेट आहे. तरुणांनी अभ्यासाकडे लक्ष देऊन जीवनातील ध्येयपूर्ती करावी हे सांगताना यशाचा पासवर्ड याबद्दल हि त्यांनी मार्गदर्शन केले.एकंदर महाविद्यालयाच्या विकासाबाबत व कार्यरत प्राध्यापकांच्या योगदाना बद्दल त्यांना अभिमान वाटतो असेही ते म्हणाले.

विद्यापीठ परीक्षा तसेच इतर परीक्षा आणि विविध स्पर्धा व क्रीडा प्रकारांमध्ये यश संपादन केलेल्या दोन्ही महाविद्यालयातील १०१ विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते तीन लाख पंधरा हजार पाचशे रुपये रोख रकमेची स्कॉलरशिप व प्रमाण पत्र देऊन गौरव करण्यात आला. स्नेहसंमेलनानिमित्त विद्यार्थ्यांनी नृत्य,नाटिका,गायन व विनोद अशा विविध कलाविष्कारांचे उत्कृष्ट सादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अंजली साबणे,प्रा.नरेश हलके यांनी केले तर आभार प्रदर्शन प्राचार्य डॉ.वाजिद चाऊस यांनी केले.या स्नेहसंमेलनास दोन्ही महाविद्यालयाचे विद्यार्थी विद्यार्थिनी व प्राध्यापक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लातूर शहरात चक्रवर्ती सम्राट अशोक यांची जयंती उत्साहात

**लातूर/प्रतिनिधी :** विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती, लातूर २०२६च्यावतीने शांती, अहिंसा आणि मानव कल्याणाचा जयघोष करणारे, सत्तेचा उपयोग प्रजेच्या उद्धारासाठी आणि नैतिक उत्थानासाठी असावा असा नवा आदर्श निर्माण करणारे, मानवासोबतच मुक्या प्राण्यांसाठीही दवाखाने उघडणारे, रस्ते, विहिरी आणि वृक्षारोपणासारखी लोक कल्याणकारी कामे करणारा पहिला कल्याणकारी राजा, भारताच्या तिरंग्यावरील अशोक चक्र हे त्यांच्याच गतिशील आणि न्यायपूर्ण विचारांचे प्रतीक आहे.

तथागत गौतम बुद्धांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करणाऱ्या सम्राट अशोक यांच्या जयंतीनिमित्त लातूर शहरात डॉ.आंबेडकर चौक, बौध्द नगर, लातूर येथून प्रारंभ करून शाहु चौक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुतळा, गंजगोलाई, हनुमान चौक, बसस्थानक, गांधी चौक ते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्क पर्यंत भिक्खू पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली ६०० फुट पंचरंगी धम्म ध्वज मिरवणूक काढण्यात आली.

या पंचरंगी धम्म ध्वज मिरवणूकीचे आयोजन विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती, लातूर २०२६चे अध्यक्ष गोविंद महादेव कांबळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले होते. या भव्य धम्मध्वज मिरवणूकीमध्ये लातूर शहर महानगरपालिकेचे नगरसेवक विनयजी जाकते, ब्ल्यू पँथरचे अध्यक्ष साधूभाऊ गायकवाड, भारतीय बौद्ध महासभेच्या आशाताई चिकटे, चिंटू गायकवाड, प्राचार्य डॉ.दुष्यंत कटारे, केशव कांबळे, सुशील चिकटे, राम कोरडे, मिलिंद धावारे, बंटी गायकवाड, रवी कांबळे, विकास कांबळे, प्रशांत माने, तुषार कांबळे, रामदास सोनवणे यांच्यासह आंबेडकरी चळवळीतील अनेक मान्यवर आणि बौद्ध उपासक उपासकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# प्रभावी संवाद कौशल्य आणि वक्तृत्व नेतृत्व विकासाची भक्कम पायाभरणी असते : डॉ. जाधव



**लातूर/प्रतिनिधी :** भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर द्वारा संचलित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जिल्हास्तरीय युवक-युवती नेतृत्व विकास शिबीर' उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या शिबिरात ''प्रभावी संवाद कौशल्य आणि वक्तृत्व कला'' या विषयावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

या प्रसंगी प्रमुख वक्ते डॉ. ज्ञानदेव राऊत (मराठी विभाग, शहीद भगतसिंग महाविद्यालय, किल्लारी) यांनी आपल्या विस्तृत मार्गदर्शनात सांगितले की, ''संवाद हा केवळ माहिती देण्याचा मार्ग नसून तो व्यक्तिमत्त्व घडवण्याचा मूलभूत पाया आहे. प्रभावी संवादासाठी विचारांची स्पष्टता, भाषेवर प्रभुत्व, आत्मविश्वास आणि श्रोत्यांशी संवाद साधण्याची क्षमता अत्यंत महत्त्वाची आहे. युवकांनी वाचन, चिंतन आणि सतत सराव यांच्या माध्यमातून वक्तृत्व कौशल्य विकसित केले पाहिजे. आजच्या डिजिटल युगातही प्रत्यक्ष संवादाची ताकद कमी झालेली नाही; उलट योग्य संवादकौशल्य असलेला युवक समाजात नेतृत्वाची भूमिका प्रभावीपणे पार पाडू शकतो.''ते पुढे म्हणाले, ''वक्तृत्व ही केवळ भाषण देण्याची कला नसून ती लोकांना प्रेरित करण्याची आणि योग्य दिशादर्शन करण्याची शक्ती आहे. नेतृत्व विकसित करण्यासाठी संवादातील प्रामाणिकपणा, संयम आणि सकारात्मक दृष्टिकोन आवश्यक आहे.''

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना डॉ. जयद्रथ जाधव (मराठी विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय, रेणापूर) म्हणाले की, ''आजच्या स्पर्धात्मक आणि वेगवान युगात युवकांनी केवळ शैक्षणिक ज्ञानावर समाधान मानू नये, तर ते प्रभावीपणे मांडण्याची कला आत्मसात करणे गरजेचे आहे. संवाद कौशल्यामुळे व्यक्तिमत्त्वाला परिपूर्णता येते आणि नेतृत्वगुणांना योग्य दिशा मिळते. जो युवक स्पष्ट, समंजस आणि प्रभावी संवाद साधू शकतो, तोच समाजात विश्वास निर्माण करून परिवर्तन घडवू शकतो.''ते पुढे म्हणाले, ''नेतृत्व म्हणजे लोकांना जोडण्याची कला आहे, आणि ही कला संवादातूनच विकसित होते. युवकांनी भीती, संकोच दूर करून आत्मविश्वासाने विचार मांडण्याची सवय लावली पाहिजे. यामुळे त्यांच्यात निर्णयक्षमता, जबाबदारीची जाणीव आणि सामाजिक बांधिलकी अधिक दृढ होते.''

या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे, कार्यक्रमाधिकारी डॉ. केशव आलगुले, डॉ. प्रमोद चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.या शिबिराच्या माध्यमातून युवक-युवतींमध्ये नेतृत्वगुण, आत्मविश्वास, प्रभावी संवाद कौशल्य आणि वक्तृत्व कला विकसित होण्यास मोठी चालना मिळत असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

## ज्ञान, संस्कृती आणि अनुभवांची अविस्मरणीय सफर; महाराष्ट्र विद्यालय, निलंगा शैक्षणिक सहल यशस्वी

**निलंगा (प्रतिनिधी) :**
''केल्याने देशाटन, मनुष्य ज्ञानसमृद्ध होतो'' या उक्तीचा प्रत्यय देणारी महाराष्ट्र विद्यालय, निलंगा येथील शैक्षणिक सहल दिनांक २० मार्च ते २३ मार्च २०२६ दरम्यान अत्यंत उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडली. या सहलीत विद्यार्थ्यांनी इतिहास, संस्कृती, धर्म आणि विज्ञान यांचा संगम प्रत्यक्ष अनुभवत ज्ञानाची नवी क्षितिजे गाठली.

या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी अजिंठा लेणी, वेरूळ लेणी, घृष्णेश्वर मंदिर, भद्रा मारुती मंदिर, दौलताबाद किल्ला, बीबी का मकबरा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, जायकवाडी धरण, संत एकनाथ महाराज समाधी आणि पैठण उद्यान या ऐतिहासिक व धार्मिक स्थळांना भेटी देऊन त्यांच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास केला.

विद्यार्थ्यांनी प्रत्येक ठिकाणी स्थापत्यकला, ऐतिहासिक वारसा, धार्मिक परंपरा व सामाजिक योगदान यांचा सखोल अभ्यास केला. पाठ्यपुस्तकातील माहिती प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळाल्याने त्यांच्या ज्ञानात लक्षणीय भर पडली आणि अभ्यासाविषयीची उत्सुकता अधिकच वाढली. या सहलीमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, सहकार्य, वेळेचे नियोजन आणि समूहभावना यांचा विकास झाला. शिक्षणासोबतच जीवनमूल्यांचेही बाळकडू मिळाल्याने ही सहल सर्वार्थाने यशस्वी ठरली. सहल यशस्वी करण्यासाठी उपमुख्याध्यापक श्री. पवार डी. डी., सहल विभाग प्रमुख श्री. सोनवणे बी. एम., तसेच श्री. सलघंटे व्ही. आर., श्री. कांबळे एस. ए., श्री. मुगळे एस. आर., श्रीमती जन्मले एस. ए., श्रीमती माळी व्ही. बी., श्री. जाधव एस. वाय. आणि श्री. सुरवसे डी. यांनी परिश्रमपूर्वक नियोजन केले.

या यशस्वी आयोजनाबद्दल महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री. विजय पाटील निलंगेकर, सचिव श्री. सरतापे तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री. नटवे एम. आर., उपमुख्याध्यापक श्री. पवार डी. डी., पर्यवेक्षिका श्रीमती देशमुख एस. डी. व पर्यवेक्षक श्री. बिराजदार आर. ए. यांनी सर्व शिक्षकांचे अभिनंदन करून त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

एकूणच, ही शैक्षणिक सहल विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक, प्रेरणादायी आणि आयुष्यभर लक्षात राहणारा अनुभव ठरली.

# राजभवन येथे भव्य शिवस्मारक करण्यासाठी संभाजी ब्रिगेडची मागणी

## उपजिल्हाधिकारी मार्फत मुख्यमंत्री यांना दिले निवेदन



**निलंगा /आयुब बागवान :** विश्ववंद्य छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण जगाचे ऊर्जा स्त्रोत असून जगातील एकमेव आदर्श राजे होते. त्यांचे भव्य शिवस्मारक उभे रहावे ही सर्व भारतीयांची इच्छा आहे परंतु त्या साठी योग्य व सक्षम निर्णय घेतला जात नाही. या विषयावर संभाजी ब्रिगेड ने वेळोवेळी पाठपुरावा सुरू ठेवलेला आहे. महोदय, आपण विरोधी पक्षात असताना आम्हला आश्वस्त केलं होतं की भाजपा सत्ते मध्ये आल्या नंतर शिवस्मारक उभं करणार. आपल्या आश्वासनाला जनतेनी साथ दिली व छत्रपतींनी आशीर्वाद दिले आणि २०१४ मध्ये तुम्ही सत्ते मध्ये आलात. मात्र शिवस्मारकासाठी साठी योग्य ठिकाण राजभवन असताना तुम्ही अरबी समुद्रात शिवस्मारक उभं करण्याचा घाट घातला, जो अशक्य होता. याला संभाजी ब्रिगेड ने विरोध करून देखील तुम्ही देशाचे प्रधानमंत्री मा. नरेंद्र मोदीं यांना निमंत्रित करून भूमिपूजन उरकून घेतले. यात जनतेच्या करातून गोळा केलेला पैसा पाण्यात घातला हे वास्तव आहे.

आज आम्ही पुन्हा आपणा कडे विनंती करतो की छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य शिवस्मारक हे राजभवन या ठिकाणी उभे करणे योग्य असून. निसर्ग सुंदर वातावरण, पुरेशी व प्रशस्त जागा, वर्षभर पर्यटकांना उपलब्ध असे ठिकाण आहे तरी या शिवस्मारका साठी सरकारने तत्काळ मंजुरी देऊन हे काम सुरू करावे ही विनंती.

अन्यथा छत्रपती शिवरायांच्या सन्मानात संभाजी ब्रिगेड ला मोठे आंदोलन उभे करावे लागेल. आपण सुज्ञ आहात तरि आपण तात्काळ निर्णय घेऊन कार्यवाही सुरू करावी.या निवेदनावर संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रमोद कदम, तालुकाध्यक्ष परमेश्वर बोधले,तालुका उपाध्यक्ष कुणाल पाटील,संघटक परमेश्वर नांगरे, शहराध्यक्ष अमोल गवळी संघटक परमेश्वर जाधव,तालुका संघटक प्रदीप कदम,शिवदास मोरे,मोहोम्मद पटेल, दत्ता बगदुरे, प्रेमनाथ कळसे, मुकिंद कदम, गोविंद कदम, अविनाश क्षीरसागर आदीच्या स्वाक्षरी आहेत.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.

शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्काराने मारुती बनसोडे सन्मानित




नळदुर्ग (विजय पिसे)–सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन मुंबई यांच्या वतीने सन २०२०– २१ ते २४ –२५ या कालावधीतील पाच वर्षाचे महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती. सेवा पुरस्काराचे २६ मार्च रोजी मुंबईत वितरण करण्यात आले यावेळी विधानसभेचे अध्यक्ष अॅड .राहुल नार्वे कर साहेब ,केंद्रीय समाज कल्याण राज्यमंत्री नामदार रामदासजी आठवले , सामाजिक न्याय मंत्री ना. संजय शिरसाट साहेब, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे साहेब, समाज कल्याण संचालक डॉ. दीपा मुधोळ – मुंडे इत्यादी उपस्थित होते. यावेळी राज्यातील एकूण १०० व्यक्ती आणि १३ संस्थांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला यात धाराशिव जिल्ह्यातून मारुती बनसोडे यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. सन्मान चिन्ह, सन्मान पत्र, शाल, आणि रोख १५००० रुपये राज्य शासनाने देऊन व्यसन मुक्तीच्या क्षेत्रात काम करणाऱ्यांचा गौरव करण्यात आला. मारुती बनसोडे हे गेली तीन चार वर्षे नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य चे धाराशिव जिल्हा संघटक म्हणून काम करीत आहेत.

अनेक शाळा, कॉलेज मध्ये जाऊन ते प्रबोधनाचे काम करीत आहेत. त्यांच्या कार्याची दखल महाराष्ट्र सरकारने घेतली असून त्यांना सन्मानित केल्या नंतर जिल्ह्यातील सामाजिक, राजकीय क्षेत्रातील व्यक्तीकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# कोणत्याही परिस्थितीत महिलांना आर्थिक सक्षम करण्यावर भर देणार – जिल्हा परिषद अध्यक्ष अर्चनाताई पाटील

धाराशिव (प्रतिनिधी) – शहरातील प्रत्येक वार्डातून पाच प्रभागातून दहा महिलांना स्वयंरोजगारासाठी स्वावलंबी करण्यासाठी प्रधानमंत्री, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेतून अर्थसहाय्य मिळवून देऊ. तर महिलांना त्यांच्या पायावर उभे करण्यासाठी मदत करण्यात येईल. तसेच शहरातील कचरा संकलनासाठी वीस घंटागाड्या देण्यासह हातलाई तलावावर म्युझिकल फाऊंटन करण्यासाठी प्रयत्न करणार आहे. कोणत्याही परिस्थितीत महिलांना आर्थिक सक्षम करण्यासाठी निश्चितपणे पाठपुरावा करण्यावर भर देणार असल्याचे आश्वासन जिल्हा परिषदेच्या नूतन अध्यक्ष अर्चनाताई पाटील यांनी दि.२४ मार्च रोजी दिले आहे. धाराशिव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात धाराशिव नगर परिषदेच्या महिला बाल कल्याण विभागाच्यावतीने जागतिक महिला दिनानिमित्त नारीशक्ती सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून बोलत होत्या. यावेळी धाराशिवच्या नगराध्यक्ष नेहा राहुल काकडे, कळंबच्या नगराध्यक्ष सुनंदा शिवाजी कापसे, धाराशिव पंचायत समितीच्या सभापती गोकर्णा गोपाळ कदम, मुख्याधिकारी नीता अंधारे यांची प्रमुख उपस्थिती होती. या सोहळ्यात विविध क्षेत्रात कर्तृत्व गाजवलेल्या ३० महिलांचा सन्मान चिन्ह, मोगऱ्याचे रोप व शाल देऊन पाटील यांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला बाल कल्याण उपसभापती दिपाली पाटील यांनी तर सूत्रसंचालन वैशाली सोनवणे यांनी आणि उपस्थितांचे आभार वैशाली सोनवणे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महिला व बाल कल्याण विभागाचे सर्व कर्मचारी, सर्व नगरसेवक यांनी परिश्रम घेतले. यावेळी महिला व नगर परिषदेचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खरीप २०२० पीक विम्याचे पैसे वाटपासाठी 'विशेष खाते' उघडण्यास मंजुरी

## जिल्ह्यातील शेतकरी बांधवांसाठी दिलासादायक निर्णय : आमदार राणाजगजितसिंह पाटील

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)– धाराशिव जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना २०२० साल खरीप हंगामातील पीक विमा परताव्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. राज्य शासनाच्या कृषी विभागाने मंगळवार २४ मार्च रोजी एक महत्त्वाचा शासन निर्णय निर्गमित केला आहे. पात्र शेतकरी बांधवांना नुकसान भरपाईचे वाटप करण्यासाठी 'वैयक्तिक ठेव खाते' उघडण्यास विशेष बाब म्हणून आपल्या महायुती सरकारने आता मान्यता दिली आहे. जिल्ह्यातील शेतकरी बांधवांसाठी हा मोठा दिलासादायक निर्णय असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

खरीप २०२० च्या पीक विम्याबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली होती. त्यावर न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार, शेतकऱ्यांना विम्याची रक्कम अदा करण्यासाठी धाराशिवच्या जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या नावाने स्वतंत्र खाते उघडण्याची आवश्यकता होती.

१३४ कोटींहून अधिकचा निधी आपल्या महायुती सरकारने उपलब्ध करुन दिला आहे. जिल्ह्यातील पात्र शेतकरी बांधवांच्या बँक खात्यात थेट पैसे जमा करण्यासाठी शासनाने निधीची व्यवस्था केली आहे. त्यानुसार प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा प्रलंबित राज्य हिस्सा म्हणून १३४ कोटी ११ लाख ९१ हजार ९३८ रुपये वितरित करण्यात आले आहेत. न्यायालयाकडून मिळालेली व्याजासह रक्कम देखील याच खात्यात जमा केली जाणार असल्याचे आमदार पाटील यांनी म्हटले आहे.

हे विशेष खाते स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये उघडले जाणार असून, त्याबाबत शासनाने कडक अटी घातल्या आहेत. हे खाते पुढील तीन वर्षांसाठी म्हणजे सन २०२५–२६ ते २०२७–२८ वैध असणार आहे. या खात्यातून होणारा खर्च केवळ खरीप २०२० वर्षामधील पात्र शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठीच केला जाणार आहे. या खात्याचे नियमित ऑडिट केले जाईल आणि दरमहा जिल्हा कोषागार कार्यालयाशी मेळ घातला जाईल. तसेच या खात्याचे वर्गीकरण 'नागरी ठेव' या अंतर्गत करण्यात आले आहे. असे सांगितले आहे.

### न्याय मिळेपर्यंत अखंड प्रयत्न करणार : आमदार राणाजगजितसिंह पाटील

**शासनाच्या या निर्णयामुळे आता धाराशिवच्या जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय तातडीने हे खाते कार्यान्वित करेल. नागपूर येथील महालेखापाल कार्यालयाकडून त्याबाबतचे प्राधिकारपत्र प्राप्त होताच, शेतकऱ्यांच्या खात्यात विम्याचा दुसरा हप्ता आणि इतर रक्कम जमा करण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल. १६ मार्च व २३ मार्च रोजी या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. यावेळी आपले वकील ड. सुधांशु चौधरी तसेच राज्य व केंद्र सरकारचे वकील उपस्थित होते. या विषयावर आपले व्यक्तिशः संपूर्ण लक्ष असून शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत आपले प्रयत्न अखंडपणे सुरूच राहतील असे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.**

# धाराशिव जिल्ह्यात चोरट्यांचा कहर! शेतकऱ्यांपासून हॉटेल मालकांपर्यंत चोरट्यानी मारला लाखोंचा ऐवज

धाराशिव (शेख अंजुम)– धाराशिव जिल्ह्यात सध्या चोरीच्या घटनांनी अक्षरशः थैमान घातले असून, ग्रामीण भागात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तुळजापूर, उमरगा आणि वाशी परिसरात सलग घडलेल्या चोरीच्या घटनांनी पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. तुळजापूर: शेततळ्यातून १३२ मीटर कॉपर वायर गायब

तुळजापूर तालुक्यातील मेसाई परिसरात शेतकऱ्यांच्या पाण्याच्या मोटारीसाठी वापरण्यात येणारी तब्बल १३२ मीटर कॉपर वायर अज्ञात चोरट्यांनी लंपास केली.

या घटनेत शेतकरी जगन्नाथ आप्पाराव नरवडे (वय ५३) यांचे मोठे नुकसान झाले असून, चोरी गेलेल्या वायरची किंमत सुमारे ६५,२४० रुपये असल्याचे सांगितले जाते.

या प्रकरणी तुळजापूर पोलीस ठाण्यात इछड ३०३(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उमरगा: शेतातून हरभऱ्याचे २७ कट्टे चोरीला

उमरगा तालुक्यातील नाईकनाफुर शिवारात चोरट्यांनी थेट शेतावर डल्ला मारत हरभऱ्याचे २७ कट्टे चोरीला नेले. शेतकरी राम गंडा घाटे (वय ६५) यांचे अंदाजे ६५,००० रुपयांचे नुकसान झाले आहे.

ही घटना २१ ते २२ मार्चच्या दरम्यान घडली असून, उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वाशी: कामगारानेच मालकाची दुचाकी लंपास, वाशी तालुक्यातील ईट येथे धक्कादायक प्रकार समोर आला आहे. हॉटेलवर काम करणाऱ्या कामगारानेच मालकाची दुचाकी चोरल्याची घटना घडली आहे.

फिर्यादी तेजस विलास भोरे (वय २५, रा. वडवणी, जि. बीड) यांच्या मालकीची चक २३ इङ ७७१२ क्रमांकाची दुचाकी (किंमत ७०,००० रुपये) त्यांचाच कामगार कल्याण शिवाजी माळी (रा. कर्जुनी, जि. बीड) याने पळवली.

या प्रकरणी वाशी पोलीस ठाण्या गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

या तिन्ही घटनांमुळे जिल्ह्यातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून, आमच्या मालमत्तेचे संरक्षण कोण करणार? असा सवाल नागरिक विचारत आहेत.

ग्रामीण भागात रात्री गस्त वाढवण्याची मागणी जोर धरत आहे. शेतकरी आणि सामान्य नागरिक सुरक्षित कधी वाटणार?

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२–२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२–२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२–२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२–२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२–२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२–२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२–२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२–२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२–२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२–२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२–२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१–२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२–२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२–२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२–२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२–२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२–२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२–२२४१८४

# प्रगणक–पर्यवेक्षकांची भूमिका निर्णायक; जनगणना अचूकतेने पार पाडा–निवासी उपजिल्हाधिकारी कडवकर






धाराशिव, (जिमाका)– भारताची जनगणना २०२७ ही डिजिटल पद्धतीने होणारी असून ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची आहे. जिल्ह्यात ही प्रक्रिया प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. प्रगणक आणि पर्यवेक्षक यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्यामुळे जनगणनेचे काम काळजीपूर्वक करावे,असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आज (दि.२६) जनगणना संचालनालय, मुंबई आणि जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी,धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय जनगणना २०२७ प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ करण्यात आला.यावेळी जनगणना संचालनालय,मुंबईचे उपसंचालक तथा प्रशिक्षक किरण गुरव,सहनिरीक्षक पवन गोडे,जिल्हा समन्वयक चेतन प्रकाश,जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे,तहसीलदार (महसूल) प्रकाश व्हटकर तसेच सहाय्यक जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी अंकित सिंह उपस्थित होते.

यावेळी बोलताना कडवकर म्हणाले की, जनगणना २०२७ साठी तालुका पातळीवर प्रगणकांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. जनगणनेचे कायदे कडक असून, जाणीवपूर्वक हलगर्जीपणा किंवा टाळाटाळ केल्यास संबंधितांना गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल.

श्री.खडसे यांनी जनगणनेचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की,जनगणना ही देशाच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे.ग्रामीण व शहरी भागातील विकास,रोजगार आणि सामाजिक परिस्थितीचा सखोल अभ्यास यामुळे शक्य होतो. तसेच केंद्र व राज्य शासनाला विविध योजना अधिक प्रभावीपणे राबविता येतात.मूलभूत सुविधांचे अचूक नियोजन करता येते आणि लोकसंख्येनुसार निधीचे न्याय्य वाटप शक्य होते.त्यामुळे प्रत्येक नागरिकाने या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेणे ही जबाबदारी आहे.

उपसंचालक किरण गुरव यांनी प्रशिक्षणाबाबत सविस्तर माहिती देताना सांगितले की, हे प्रशिक्षण चार्ज ऑफिसरकरिता असून पुढील दोन महिन्यांत त्यांच्या जबाबदाऱ्यांचे नियोजन केले जाईल.जनगणना दोन टप्प्यात पार पडणार असून प्रगणक प्रत्येक घरात जाऊन मोबाईल पच्या माध्यमातून माहिती संकलित करणार आहे.जनगणनेचे तांत्रिक पैलू,पायाभूत सुविधामाहिती संकलनाची प्रक्रिया आणि त्याचा उपयोग याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

पहिल्या टप्प्यात प्रगणक कुटुंबप्रमुखाकडून ३३ प्रश्नांच्या आधारे माहिती संकलित करणार असून प्रत्येक कुटुंबाने आपल्या सोयी–सुविधांची माहिती देणे आवश्यक आहे.जनगणनेत निष्काळजीपणा केल्यास संबंधितांवर कारवाईची तरतूद आहे.ही जनगणना पहिल्यांदाच पूर्णपणे डिजिटल पद्धतीने होणार आहे.सन १८७२ पासूनची ही सोळावी आणि स्वातंत्र्यानंतरची आठवी जनगणना आहे.संकलित माहिती न्यायालयीन कामकाजात वापरता येणार नाही,तसेच एका प्रगणकाला काम पूर्ण करण्यासाठी ३० दिवसांचा कालावधी देण्यात येणार असल्याचे गुरव यांनी सांगितले.

सहनिरीक्षक पवन गोडे यांनी सांगितले की,जनगणना २०२७ चा पहिला टप्पा १६ मे ते १४ जून २०२६ दरम्यान होणार असून या कालावधीत घरयादी व घरगणना केली जाईल.दुसरा टप्पा ९ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी २०२७ दरम्यान पार पडणार आहे.निर्धारित वेळेत अचूक माहिती संकलन करणे अत्यंत महत्त्वाचे असून प्रगणक व पर्यवेक्षकांची कर्तव्ये निश्चित करण्यात आली आहेत.

या प्रशिक्षण शिबिरास चार्ज ऑफिसर म्हणून सर्व तहसीलदार, नगरपालिकांचे सर्व मुख्याधिकारी,नायब तहसीलदार, तांत्रिक अभियंते,जनगणना लिपिक, तांत्रिक सहाय्यक तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील महा आयटी व जिल्हा सूचना व विज्ञान केंद्रातील कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनी प्रशिक्षकांना प्रश्न विचारून जनगणनेबाबतच्या शंका निरसन करून घेतले.

प्रशिक्षणाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील जनगणना कक्षाचे सहाय्यक महसूल अधिकारी (जनगणना) दीपक चिंतेवार,विशाल वाघमारे,सुजित टिके,श्रीमती मनीषा वाघमारे,महसूल सहाय्यक गहनीनाथ देवगिरे व संजय पवार यांनी परिश्रम घेतले.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649